उद्या अंक नाही!

गणेश चतुर्थीनिमित्त सोमवार, दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी कृषीवल कार्यालयाला सुट्टी असल्याने मंगळवार, दि. १५ सप्टेंबरचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची सर्व वाचक, वितरक, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार । दि. १४ सप्टेंबर २०२६ । अंक १०० । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in








## रायगडात १,०५,३४५ गणेशमूर्तींची आज प्राणप्रतिष्ठा




**प्रमोद जाधव**
**। रायगड ।**

विघ्नहर्ता, सुखकर्ता-दुःखहर्ता गणपती बाप्पाच्या आगमनाने आज संपूर्ण रायगड भक्तीच्या रंगात न्हाऊन निघणार आहे. ढोल-ताशांचा गजर, फुलांची आरास, मंगलमय वातावरण आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात सोमवारी (दि. १४) जिल्ह्यात तब्बल एक लाख पाच हजार ३४५ गणेशमूर्तींची विधीवत प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे. गेल्या काही दिवसांपासून बाप्पाच्या स्वागताची सुरू असलेली लगबग आज पूर्णत्वास येणार असून, पुढील दहा दिवस रायगडच्या कानाकोपऱ्यात आरती, भजन, कीर्तन आणि भक्तीगीतांचे स्वर घुमणार आहेत. बाजारपेठाही गणेशभक्तांच्या गर्दीने फुलून गेल्या आहेत. सजावटीचे साहित्य, फुले, पूजेचे साहित्य आणि नैवेद्याच्या खरेदीसाठी रविवारी बाजारपेठांमध्ये भक्तांनी मोठी गर्दी केली होती.

गतवर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल १८ दिवस उशिरा गणरायाचे आगमन होत आहे. त्यामुळे बाप्पाच्या आगमनाची उत्सुकता अधिकच वाढली आहे. पारंपरिक पद्धतीने विधिवत पूजा करून घरगुती तसेच सार्वजनिक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. काही भक्त रविवारीच बाप्पाला घरी आणणार असून, काहीजण सोमवारी वाजतगाजत गणरायाला घरी घेऊन येणार आहेत.

गणरायाच्या स्वागतासाठी घरांमध्ये विविध प्रकारच्या आकर्षक सजावटी केल्या जात आहेत. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनीही सामाजिक संदेश देणारे देखावे आणि उपक्रमांचे नियोजन केले आहे. यंदा नशामुक्ती, 'बेटी बचाव, बेटी पढाव', स्वच्छता यांसारख्या विषयांवरील चलचित्रांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. पारंपरिक भजनांसह जाखडी नृत्य आणि विविध सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांनी गणेशोत्सवाची रंगत वाढणार आहे. •>पान २ वर

## कोकणकरांसाठी आनंदवार्ता

### मध्य रेल्वेकडून चार अनारक्षित फेऱ्या जाहीर



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी मध्य रेल्वेने मुंबईतून आणखी चार अनारक्षित फेऱ्या जाहीर केल्या आहेत. गाडी क्रमांक ०१००९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून १२ आणि १३ सप्टेंबरला दुपारी १.४५ वाजता सुटेल, तर परतीची गाडी क्रमांक ०१०१० सावंतवाडी रोडहून १३ आणि १४ सप्टेंबरला पहाटे ४.०५ वाजता सुटणार आहे. अनारक्षित गाड्यांना दादर, ठाणे, पनवेल, पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, रत्नागिरी, राजापूर रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ आणि झारापसह २३ स्थानकांवर थांबा देण्यात येणार आहे. या गाड्यांना १२ शयनयान, सहा सामान्य द्वितीय श्रेणी आणि दोन गार्ड ब्रेक व्हॅन असतील. अनारक्षित डब्यांसाठी यूटीएस प्रणाली तसेच रेलवन ॲपद्वारे तिकीट काढता येणार आहे. दरम्यान, गणेशोत्सवासाठी १४ ते १५ सप्टेंबरदरम्यान देशभरात ३८६ गणपती विशेष गाड्या धावणार आहेत. •>पान २ वर






## ठाणे-अलिबाग एसटीला अपघात



- चालक, वाहकासह २३ प्रवासी सुखरूप
- सागावनजीक रस्त्यालगत एसटी घसरली

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग-पेण रस्त्यावर कार्लेखिंड उतारावरील सागाव गावानजीक ठाणे-अलिबाग एसटीला अपघात घडला. अलिबागकडून पेणच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या एसटीला वाचविण्याच्या प्रयत्नात ठाणे-अलिबाग एसटीच्या चालकाचा वेगावरील ताबा सुटला आणि एसटी रस्त्यानजीक घसरली. यामुळे एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या काळजाचा ठोका चुकला होता. अपघात घडलेल्या एसटीमध्ये चालक आणि वाहकासह २३ प्रवासी प्रवास करीत होते. घडलेल्या अपघातात काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. हा अपघात रविवार, दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास घडला.

गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. चाकरमानी गणेशाच्या स्वागतासाठी मिळेल त्या वाहनाने आपल्या गावाच्या दिशेने येत आहेत. रविवारी सकाळी ठाणे येथून अलिबागच्या दिशेने एसटी महामंडळाची बस निघाली. बस उरण डेपोची होती. ठाणे-अलिबाग एसटी कार्लेखिंड परिसर सुरक्षित उतरून अलिबागच्या दिशेने रवाना झाली होती. कार्ले खिंडीच्या अलिबागच्या दिशेला असणाऱ्या अवघड वळणावर ही एसटी आली. त्याचवेळी अलिबाग येथून पेणच्या दिशेने जाणारी एसटी महामंडळाची बस ठाणे-अलिबाग एसटीच्या समोर आली असता त्या एसटीला धडक बसू नये यासाठी ठाणे-अलिबाग एसटीच्या चालकाने प्रसंगावधान राखत एसटी बाजूने सुरक्षित नेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यादरम्यान एसटी चालकाचे वेगावरील नियंत्रण सुटले. यामुळे एसटी रस्त्याच्या साईडपट्टीवरून घसरली आणि नजीकच्या शेतात घुसली. यावेळी •>पान २ वर




# उरणमध्ये बेशिस्त पार्किंगचा धुमाकूळ!



। उरण । प्रतिनिधी ।

उरण शहरात बेशिस्त पार्किंगने वाहतूक व्यवस्थेची अक्षरशः वाट लावली आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठा वाहनतळ बनल्या असून, 'दिसला मोकळा रस्ता की लाव गाडी' या मानसिकतेमुळे उरणकरांना वाहतूक कोंडीचा रोजचा सामना करावा लागत आहे.

उरण कोटनाका, पालवी हॉस्पिटल, चारफाटा, गणपती चौक, वैष्णवी हॉटेल, बोरी नाका, बाजारपेठ, मोरा मार्ग, नागावकडे जाणारा रस्ता तसेच प्रमुख व्यापारी परिसरात रस्त्याच्या कडेला वाहने अस्ताव्यस्त उभी केली जात आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याचा मोठा भाग पार्किंगने व्यापला जात असल्याने वाहने एकमेकांना ओव्हरटेक करताना कोंडी निर्माण होत आहे.

फुटपाथवरही वाहने, हातगाड्या, फळविक्रेते आणि फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने पादचाऱ्यांसाठी रस्ता ओलांडण्याची वेळ आली आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि लहान मुलांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून चालावे लागत आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उरणमध्ये वाहनांची वर्दळ आणखी वाढणार आहे. गणेशमूर्ती खरेदी, सजावटीचे साहित्य, बाजारपेठेतील गर्दी आणि बाहेरगावी जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीवरील ताण वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत बेशिस्त पार्किंगवर वेळीच कारवाई झाली नाही, तर उरण शहर अक्षरशः वाहतूक कोंडीत अडकण्याची भीती आहे.

पार्किंगची सुविधा अपुरी असणे हा प्रशासनाचा विषय असू शकतो; मात्र त्यामुळे सार्वजनिक रस्ते खासगी वाहनतळ बनविण्याचा परवाना कोणालाही मिळत नाही. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने बघ्याची भूमिका घेतली तर परिस्थिती आणखी गंभीर होणार आहे.

प्रशासनाने प्रमुख रस्त्यांवर नो-पार्किंग क्षेत्र निश्चित करून बेशिस्त वाहनांवर कठोर कारवाई करावी, वाहतूक पोलिसांची गस्त वाढवावी आणि गणेशोत्सवासाठी स्वतंत्र वाहतूक नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. उरणच्या रस्त्यांवर वाहनांचा कब्जा कायम राहणार की प्रशासन आता जागे होणार, हा खरा सवाल आहे.

## दर्यागाव येथे वह्यांचे वाटप



। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

दर्यागाव येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत रासळ नवरात्र मंडळाचे अध्यक्ष तथा शिक्षक सुचिर खाडे यांच्याकडून शनिवारी (दि.१२) शाळेतील आदिवासी व गरजू विद्यार्थ्यांना २०० पानी ३० डझन वह्यांचे वाटप करण्यात आले. सुधागड तालुक्यात ठाकूर, कातकरी आदिवासी समाजाचे प्रमाण जास्त असून, या समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. शिक्षणाबाबत अनुत्सुकता दिसून येत असल्याने अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी खाडे सरांनी हा मदतीचा हात पुढे केला आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राम वाघ, उपाध्यक्ष लक्ष्मी हंबीर, मुख्याध्यापक राजू बांगारे, नरेंद्र कोकाटे, सर्व सदस्य, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## गणेशोत्सवाच्या सजावटीला महागाईचा साज

### महाड-पोलादपूर बाजारपेठा सजावटीच्या साहित्याने फुलल्या

। महाड । प्रतिनिधी ।

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आल्याने महाड आणि पोलादपूरच्या बाजारपेठा गणेश सजावटीच्या साहित्याने बहरल्या आहेत. मात्र, वाढलेले इंधन व वाहतूक खर्च आणि बाजारातील चढ-उतारामुळे यंदा सजावटीच्या साहित्याच्या दरात वाढ झाली आहे. तरीही गणेशभक्तांकडून आकर्षक व हटके सजावटीच्या साहित्याला चांगली मागणी आहे.

कागदी फुलांच्या माळा, मोत्यांचे हार, तयार मखर, पाट, चौरंग, कापडी आरास, कागदी मुखवटे, पताका, झिरमिळ्या, छत्र, चक्र, मोरपीस आणि विविध प्रकारच्या लायटिंगने बाजारपेठ सजली आहे. मोत्यांच्या माळांचे दर ३० ते ३५० रुपये, छत्र ९० ते १५०, चक्र ६० ते ५००, लायटिंग १०० ते ७०० रुपये, तर तोरण सुमारे १५० रुपयांपासून उपलब्ध आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी अनेक नागरिक घरच्या घरी सजावट करण्यासही प्राधान्य देत आहेत. कार्डशीटपासून मंदिर तसेच कापडी आरास तयार करण्याकडे कल वाढला आहे.



गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अगरबत्ती, धूपकांडी आणि कापूराची विक्रीही वाढली आहे. गुलाब, मोगरा, जुई, जास्वंद, चाफा यांसह आंबा, अननस, स्ट्रॉबेरी, चेरी अशा विविध सुगंधांच्या अगरबत्त्या बाजारात दाखल झाल्या आहेत. मुंबई, पुणे, बंगळुरू तसेच स्थानिक उत्पादकांचे विविध प्रकार उपलब्ध झाले आहेत.

महाड ही दक्षिण रायगडमधील प्रमुख बाजारपेठ असल्याने आसपासच्या गावांमधून मोठ्या प्रमाणावर ग्राहक येथे खरेदीसाठी येत आहेत. पोलादपूर बाजारपेठेतही सजावटीच्या साहित्याची दुकाने सजली असून गणेशोत्सवाच्या निमित्ताने लाखो रुपयांची उलाढाल अपेक्षित आहे.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवातून निसर्ग संवर्धनाचा संदेश

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबविणाऱ्या रि सस्टेनेबिलिटी लिमिटेडच्यावतीने यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त तब्बल ५ हजार पर्यावरणपूरक श्री गणेशमूर्तींचे मोफत वितरण करण्यात येत आहे. सोमनाथ मलगर यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून गणेशभक्तांसोबतच समाजामध्ये पर्यावरण संवर्धनाचा संदेश पोहोचविण्यात येत आहे.



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. श्रद्धा आणि भक्तिभावाने हा उत्सव साजरा करताना पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कंपनीचे कर्मचारी, विविध गृहनिर्माण संस्थांमधील सभासद, शासकीय अधिकारी तसेच समाजातील विविध घटकांना या गणेशमूर्तींचे मोफत वितरण करण्यात येत आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून तयार केलेल्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नाहीत. तसेच, काही मूर्तींवर वापरण्यात येणाऱ्या रासायनिक रंगांमुळे जलप्रदूषण होऊन जलचर सृष्टीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा वापर करण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे.

या उपक्रमातील गणेशमूर्ती नैसर्गिक माती, नारळाच्या शेंड्यांपासून तयार होणारे कोकोपीट, बियाणे आणि सेंद्रिय खत अशा पर्यावरणपूरक घटकांपासून तयार करण्यात आल्या आहेत. गणेशोत्सवानंतर या मूर्तींचे पाण्यात विसर्जन न करता घरच्या घरी कुंडीतील मातीत ठेवता येते. कालांतराने मूर्ती मातीत मिसळते आणि त्यातील बियाण्यांपासून नवीन रोपाची निर्मिती होऊ शकते.

## नेरळ पोलिसांचे शक्तीप्रदर्शन



। नेरळ । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या काळात गणेशभक्तांना सुरक्षित वाटावे यासाठी नेरळ पोलिसांनी शनिवारी (दि.१२) सकाळी शक्ती प्रदर्शन केले. यादरम्यान, नेरळ येथे दिवसभर वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. गणेशोत्सवानिमित्त शनिवारी नेरळ गावात पोलिसांनी शक्ती प्रदर्शन केले. प्रभारी अधिकारी राहुल वरोटे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये पोलीस दलाचे शक्ती प्रदर्शन दिसून आले. त्यानंतर नेरळ पोलिसांचे पथक वाहतूक सुरळीत राहावी यासाठी नेरळ हुतात्मा चौक, जकात नाका, विठ्ठल रुक्मिणी प्रवेशद्वार टिवाले नाका, हुतात्मा हिराजी पाटील चौक, नेरळ पाडा गेट, रेल्वे स्टेशन नाका, एसटी स्टँड आणि साई मंदिर नाका इत्यादी ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी तैनात होते. तर, दुसरीकडे नेरळ बाजार पेठ येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस तैनात आहेत.

## १९ सप्टेंबरला मुंबईला जाणारच

### जरांगेंचा पोलिसांना इशारा

। मुंबई । प्रतिनिधी ।

गेल्या १५ दिवसांपासून बेमुदत उपोषण सुरू असतानाही अद्याप तोडगा निघालेला नसताना १९ सप्टेंबरच्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारल्याने मनोज जरांगे पाटील आक्रमक झाले आहेत. आंदोलन सुरू करण्यापूर्वीच नियमभंगाची शक्यता कशी गृहित धरली जाते, असा सवाल करत जरांगेंनी सरकार आणि पोलिसांच्या भूमिकेवर संताप व्यक्त केला.



मुंबई पोलिसांनी 'जाहीर सभा, आंदोलने व मिरवणुका नियम २०२५'चा नियमभंग होण्याची शक्यता असल्याचे कारण देत आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाने जरांगेंना मुंबईत येण्यापासून रोखता येणार नाही, असा निर्णय दिला होता. त्यामुळे सरकार न्यायदेवतेच्या निर्णयाचा अपमान करत असल्याचा आरोप जरांगेंनी केला. आंदोलन करण्याआधीच आम्ही नियमभंग करणार आहोत, असे त्यांना का वाटते? कोणत्या कायद्याने राज्य चालवत आहात? राज्यात ही काय अस्थिरता आहे? असे सवाल जरांगेंनी उपस्थित केले. मी १९ सप्टेंबरला मुंबईला जाणारच. पोलिसांच्या परवानगीबाबत वकील बांधव निर्णय घेतील. आम्ही लोकशाही मार्गाने शांततेत आंदोलन करणार आहोत. न्यायदेवतेने कोणालाही आम्हाला रोखता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे, असे मनोज जरांगे म्हणाले.

## कोकणाकडे जाणारी एसटी रस्त्यातच बंद

### गणेशभक्तांचे हाल; एसटी महामंडळाच्या कारभारावर संताप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

गणेशोत्सवासाठी कोकणाकडे निघालेल्या गणेशभक्तांच्या प्रवासात एसटी महामंडळाच्या ढिसाळ कारभारानेच विघ्न आणले. बोरीवलीहून राजापूरकडे जाणारी ग्रुप बुकिंगची एसटी बस शनिवारी सकाळी मुंबई-गोवा महामार्गावरील नागोठणे येथे रस्त्यातच बंद पडली. त्यामुळे लहान मुले, महिला आणि वयोवृद्ध प्रवाशांना अनेक तास रस्त्यात ताटकळत राहावे लागले. पैसे भरूनही खराब बस मिळत असल्याने प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना सोमवारी (दि. १४) होणार असल्याने बाप्पाच्या स्वागतासाठी तसेच सजावटीसाठी गणेशभक्त मूळ गावी जाण्यासाठी एसटी बसला पसंती देत आहेत. बोरीवलीहून राजापूरला निघालेली ग्रुप बुकिंगची बस नागोठणे येथेच बंद पडल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. बसची अवस्था खराब असल्याने प्रवासातच बिघाड झाल्याची तक्रार प्रवाशांनी केली.

गणेशोत्सवाच्या काळात एसटी बसेस रस्त्यातच बंद पडत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजी आहे. यापूर्वीही नागोठणे उड्डाणपुलाजवळ सर्व्हिस रोडवर एसटी बंद पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती. पैसे भरूनही खराब बस दिल्या जात असल्याचा आरोप प्रवाशांनी केला आहे. राजकीय पक्षांनी बुकिंग केलेल्या बसेस मात्र चांगल्या दिल्या जात असल्याचा आरोपही प्रवाशांनी केला. त्यामुळे गणेशोत्सवातील एसटीच्या नियोजनावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## लालपरीच्या सारथ्यांचे नवी मुंबईत हाल

### चालक-वाहकांना ना पाणी, ना स्वच्छतागृह

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

कोकणवासियांचा मोठा सण असणाऱ्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) कंबर कसल्याचा दावा केला असला, तरी या नियोजनामागील भीषण वास्तव आता समोर आले आहे. कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरालगत सुमारे २५० एसटी बसेस थांबवण्यात आल्या आहेत. मात्र, या बसेसवर कर्तव्य बजावणाऱ्या ४५० हून अधिक चालक आणि वाहकांसाठी अन्न, पिण्याचे पाणी, प्रकाश व्यवस्था आणि स्वच्छतागृहांची कसलीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. प्रशासनाच्या या ढिसाळ नियोजनामुळे हजारो प्रवाशांना सुखरूप कोकणात पोहोचवणाऱ्या लालपरीच्या सारथ्यांचे उघड्यावर अक्षरशः हाल होत आहेत.



**नेत्यांची बॅनरवर चमकोगिरी**

सध्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका क्षेत्र, पनवेल एसटी डेपो परिसर आणि महामार्गांवर स्थानिक आमदार, खासदार आणि आजी-माजी नगरसेवकांचे चाकरमान्यांचे स्वागत करणारे मोठमोठे फ्लेक्स व बॅनर्स झळकत आहेत. मात्र, ज्या बसेसच्या भरवशावर चाकरमानी कोकणात जाणार आहेत, त्या बसेसच्या चालकांची आणि वाहकांची सुध घेण्यास एकाही लोकप्रतिनिधीला वेळ मिळालेला नाही. लोकप्रतिनिधी केवळ राजकीय श्रेयवादात आणि सोशल मीडियावरील प्रसिद्धीत मग्न असून, प्रत्यक्ष जमिनीवर मदतकार्य शून्य असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.

नवी मुंबई विमानतळ लगतच्या मोकळ्या जागेत उभ्या असलेल्या या बसेसमध्ये संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध आगारांतून चालक-वाहक दाखल झाले आहेत. मात्र, या ठिकाणी पोहोचल्यानंतर प्रशासकीय अनास्थेचा तीव्र फटका त्यांना बसला आहे.परिसरात पिण्याच्या पाण्याचा एकही टँकर किंवा व्यवस्था नाही.परिसरामध्ये अंधाराचे साम्राज्य असून पुरेशा दिव्यांची सोय नाही.लघुशंका व शौचासाठी फिरती स्वच्छतागृहे उपलब्ध न केल्याने चालक-वाहकांना उघड्यावर जावे लागत आहे. जेवणाची सोय नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांवर उपाशीपोटी किंवा निकृष्ट अन्न खाऊन रात्र काढण्याची वेळ आली आहे. यामुळे संताप व्यक्त होत आहे.

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती छाया रमेश चंदन, श्री.श्रेयश रमेश चंदन यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गणेगाव चिंचवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३३/२/अ/३ ज्याचे क्षेत्रफळ १.५१.५0 गुंठे पैकी लिहुन देणार याचे हिश्याचे क्षेत्र 0.२४.२५ गुठ्ठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक :१४/0९/२0२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९0२८५९२७९८

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ.भाग्यश्री विकास गायकवाड यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४६/२ ज्याचे क्षेत्रफळ 0.२३.00 गुठ्ठे क्षेत्र जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १४/0९/२0२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९0२८५९२७९८

## पान १ वरुन

### आज प्राणप्रतिष्ठा

रायगड जिल्ह्यात यंदा एकूण एक लाख पाच हजार ३४५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. यामध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या २९१, तर घरगुती एक लाख पाच हजार ५४ गणेशमूर्तींचा समावेश आहे. यापैकी दीड दिवसांच्या २६ हजार १८२, पाच दिवसांच्या एक हजार ३३८, सहा दिवसांच्या ५८ हजार ९१ आणि अकरा दिवसांच्या अर्थात अनंत चतुर्दशीच्या १३ हजार ५९८ गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे.

गणेशोत्सव आनंदात आणि शांततेत पार पडावा यासाठी रायगड पोलिसांनीही कंबर कसली आहे. जिल्ह्यात तब्बल दोन हजार ८९४ पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये सात पोलीस उपअधीक्षक, २९ पोलीस निरीक्षक, १२८ सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, एक हजार ९०० पोलीस अंमलदार, ५०० होमगार्ड, बाहेरील ३० पोलीस अधिकारी आणि ३०० पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. याशिवाय एक एसआरपीएफ दल, चार आरसीपी दल, एक अतिशीघ्र कृती दल आणि ११ स्ट्रायकींग फोर्स तैनात करण्यात येणार आहेत.

बाप्पाच्या आगमनाने रायगडमध्ये पुढील दहा दिवस भक्ती, उत्साह आणि आनंदाचे वातावरण राहणार आहे. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात विघ्नहर्त्याचे स्वागत करताना गणेशोत्सव शांततेत, शिस्तीत आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्याचे आवाहन रायगड पोलीस अधीक्षक आचल दलाल यांनी केले आहे.

**६५५ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी रायगड पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. उत्सवादरम्यान धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर होणार आहे. या काळात कोणत्याही कारणातून वाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तसेच मुंबई पोलीस अधिनियम आणि मुंबई प्रोव्हिन्सियल मॅजिस्ट्रेट्स ॲक्टअंतर्गत ६५५ जणांविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

**२९१ विसर्जनस्थळे निश्चित**

| | |
|---|---|
| **समुद्र** | १३ |
| **खाडी** | ४ |
| **नदी** | २११ |
| **तलाव** | ५४ |
| **इतर ठिकाणे** | ९ |
| **एकूण** | २९१ |

**सोशल मीडियावर सायबर सेलची नजर**

गणेशोत्सवाच्या काळात सोशल मीडियावरून चुकीच्या किंवा आक्षेपार्ह पोस्ट, अफवा अथवा समाजात तेढ निर्माण करणारा मजकूर प्रसारित होऊ नये, यासाठी रायगड पोलिसांच्या सायबर सेलची विशेष नजर राहणार आहे. सोशल मीडियावर गणेशोत्सवाच्या तयारीचे रिल्स आणि विविध पोस्ट मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत असताना त्यावर देखरेख ठेवण्यासाठी एक पोलीस अधिकारी आणि पाच पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**रेल्वे, बसस्थानकांवरही बंदोबस्त**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये गर्दी वाढली आहे. जिल्ह्यात विविध भागांतून ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढणार असल्याने रेल्वे आणि बस स्थानक परिसरात विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. अलिबाग, महाड, माणगाव, कर्जत, रोहा, पेण, श्रीवर्धन आणि खालापूर येथील रेल्वे व बसस्थानक परिसरात एकूण ८४ पोलीस अंमलदार तैनात करण्यात येणार आहेत.

### कोकणकरांसाठी आनंदवार्ता

यामध्ये मध्य रेल्वेच्या २५८, पश्चिम रेल्वेच्या ६४, कोकण रेल्वेच्या ५८ आणि दक्षिण मध्य रेल्वेच्या सहा विशेष गाड्यांचा समावेश आहे. स्थानकांवर आरपीएफ, जीआरपी आणि शहर पोलीस यांच्यावर सुरक्षेची जबाबदारी असणार आहे.

### ठाणे-अलिबाग एसटीला अपघात

एसटीमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये भीतीचे सावट पसरले होते. यावेळी एसटीत २३ प्रवासी प्रवास करीत होते. या अपघातात काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. या प्रवाशांना स्थानिक आणि पोलीस यंत्रणेने सुखरूप बाहेर काढले. घडलेल्या अपघाताबाबत एसटी चालकाला विसरले असता समोरून येणाऱ्या एसटीला वाचविण्याच्या प्रयत्नांत हा अपघात घडला असल्याचे सांगितले. या अपघातानंतर काही काळ रस्त्यावर वाहतूक कोंडी झाली होती. वाहतूक पोलिसांनी वेळेत घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत केली आहे.

## दोन कोटींचा मुद्देमाल परत

**पनवेल :** पनवेल विभागाकडील पोलीस ठाण्यामध्ये जप्त असणारा दोन कोटींचा मुद्देमाल फिर्यादी आणि साक्षीदार यांना १२ सप्टेंबर रोजी पनवेलचे सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे बाळा कुंभार, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे गजानन घाडगे यांच्या हस्ते परत करण्यात आला. पनवेल शहर पोलीस ठाणे, पनवेल तालुका पोलीस ठाणे आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याकडील विविध गुन्ह्यांमध्ये विविध स्वरूपाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. यावेळी एकूण १७ गुन्ह्यातील, १४३ मिसिंगमधील १०७ तोळे सोने, सात वाहने, १४३ मोबाईल फोन, असा एकूण दोन कोटी सात लाख ५७ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल फिर्यादी यांना परत करण्यात आला.

दिनांक : १४ सप्टेंबर २०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे धोत्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.-आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| नियती जितेंद्र घाटवळ | ८१ | ३१ | ०-४५-०० | ० | ३६ |

सदरील मिळकतीपैकी लिहून देणार यांचे मालकीचे हे.आर.पॉ ०.२१.०० इतके क्षेत्र

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,

सही/ -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १४/०९/२०२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल सौ. सविता विकास पवार यांनी खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. अरूण जयराम हरपुडे, राहणार मु. पो. मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे. यापुर्वी सदर जमिनीबाबत दैनिक कृषीवल या वृत्तपत्रामध्ये दिनांक १२.0८.२0२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या जाहीरातीनुसार ठरलेला खरेदीचा व्यवहार आता पुर्णपणे रद्द झाला असून आता खालील नमूद क्षेत्र नव्याने विक्री करावयाचे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | विकत घ्यावयाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पै |
|---|---|---|---|---|
| मौजे कशेळे, ता.कर्जत, जि.रायगड | २१/३ | 0.७0.00 | 0.४0.00 (४0 गुंठे ) | 0.६२ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून 0७ (सात) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही आणि सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व वादमुक्त आहे असे समजून आमचे आशिल सदर जमीन खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार किंवा हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १४.0९.२0२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा. फ्लॅट नं. १0१, पाल टॉवर,
भिसेगाव, ता. कर्जत जि. रायगड.
मो.९३0७८८५७११




# ४० वर्षांचा वनवास संपणार!

विठ्ठल ममताबादे

| उरण |

- उरणच्या २५६ प्रकल्पग्रस्तांचे होणार पुनर्वसन
- आठवडाभरात अंतिम यादी देण्याचे उच्च न्यायालयाचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश
- जेएनपीएला पुढील कार्यवाही दोन आठवड्यांत पूर्ण करण्याचे आदेश

जेएनपीटीच्या उभारणीसाठी घरदार आणि जमीन गमावून तब्बल चार दशकांपासून पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत असलेल्या उरणमधील प्रकल्पग्रस्तांना अखेर न्यायालयीन लढ्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. २५६ प्रकल्पग्रस्त कुटुंबांची यादीच अंतिम मानून पुढील पुनर्वसनाची कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकारच्या दिरंगाईमुळे रखडलेल्या पुनर्वसनाला आता निर्णायक दिशा मिळाली आहे.

उरण तालुक्यातील समुद्रकिनारी उभारण्यात आलेल्या जेएनपीटी (जेएनपीए) बंदरासाठी जुना शेवा कोळीवाडा येथील जमीन संपादित करण्यात आली. यावेळी स्थानिक रहिवाशांना कायमस्वरूपी योग्य पुनर्वसन न करता हनुमान कोळीवाडा आणि नवीन शेवा येथे तात्पुरते स्थलांतरित करण्यात आले. मात्र, चार दशकांचा कालावधी उलटूनही या प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरूपी पुनर्वसन झाले नाही. मूलभूत सुविधांसह विविध मागण्यांसाठी आंदोलने, उपोषणे, संप आणि पत्रव्यवहार करूनही शासनाकडून ठोस कार्यवाही झाली नाही. अखेर हा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला.

महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर्स युनियन व अन्य विरुद्ध जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण व अन्य या रिट याचिका क्र. ८६५५/२०२५ प्रकरणात ११ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायमूर्ती मनिष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम व्ही. शिरसाट यांच्या खंडपीठाने महत्त्वपूर्ण आदेश दिला.



**३० सप्टेंबरला पुढील सुनावणी**

चार दशकांपासून प्रलंबित असलेल्या पुनर्वसनाच्या प्रश्नावर उच्च न्यायालयाने घेतलेल्या या भूमिकेमुळे प्रकल्पग्रस्तांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. केंद्र आणि राज्य शासनाच्या दिरंगाईमुळे रखडलेला प्रश्न आता न्यायालयीन आदेशामुळे मार्गी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे २५६ प्रकल्पग्रस्त कुटुंबांना अखेर कायमस्वरूपी पुनर्वसनाचा न्याय मिळण्याची प्रतीक्षा आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार, प्रकल्पग्रस्त व लाभार्थी कुटुंबांच्या पात्रतेची पडताळणी प्रक्रिया २०२३ मध्येच पूर्ण झाली होती. पनवेलचे उपविभागीय अधिकारी यांनी २ फ ेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हाधिकारी (पुनर्वसन), रायगड यांना पाठविलेल्या पत्रासोबत २५६ प्रकल्पग्रस्त कुटुंबांची यादी सादर केली होती. ही यादी १७ फेब्रुवारी २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली होती. त्यामुळे २ फेब्रुवारी २०२३ रोजी एसडीओ यांनी पाठविलेली २५६ कुटुंबांची यादी नव्या ठिकाणी पुनर्वसित करण्यात येणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची अंतिम यादी म्हणून ग्राह्य धरावी, असे स्पष्ट निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.



● माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई पाटील यांची जयंती अलिबाग येथील शेतकरी भवनमध्ये साजरी करण्यात आली. दरम्यान, शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत, नागेश कुळकर्णी यांच्यासह कार्यकर्त्यांनी उपस्थित राहात त्यांना विनम्र अभिवादन केले.

## बाप्पा तुझं येणं...

पाहताच तुला बाप्पा
विसरून गेले भान,
डोळ्यातून आनंदाश्रू वाहात
शब्दांचे हरवले भान...

डोळ्यात तुझ्या आपुलकीचे
दिसतात मला भाव,
विसरून जाते देवा,
माझा मलाच लागत नाही ठाव..

रूप तुझे सुंदर
वर्णन करू तरी मी काय,
शब्दांच्या पलीकडचे सौंदर्य
तू वात्सल्याची माय...

तुझ्या येण्याच्या चाहुलीने
वेदनांचे हरवते पान,
तुझ्या दर्शनाने होते
माझे मन बेभान...

खूप काही सांगायची असते
बाप्पा माझ्या मनाची व्यथा,
तुला पाहताच विसरते
माझ्या सर्व दुखमय कथा...

बाप्पा तुझं येणं
म्हणजे माझं तुझ्यात गुंतणं
सर्व काही बाजूला सारून
माझं मला विसरणं...

**ज्योती रावराणे**, कांजुरमार्ग-मुंबई



● आपल्या लाडक्या बाप्पाला डोक्यावरुन घेऊन जाणारे भाविक. (छायाचित्र : समीर मालोदे)

## २१ जिल्ह्यांत अपुरा पाऊस

| पुणे | प्रतिनिधी |

यंदाच्या मान्सूनवर एल निनोचा प्रभाव राहिल्याने राज्यात पावसाने सरासरी गाठलेली नाही. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या (आयएमडी) आकडेवारीनुसार, १ जून ते १२ सप्टेंबरदरम्यान राज्यात सरासरीपेक्षा १५ टक्के कमी पाऊस झाला आहे. त्यामुळे ३६ पैकी २१ जिल्ह्यांत अपुऱ्या पावसाची स्थिती असून, शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

अमेरिकी हवामान संस्था 'नोआ'च्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरच्या अंदाजानुसार, एल निनोचा प्रभाव आणखी काही काळ राहणार असला तरी पुढील वर्षी मान्सूनच्या आगमनापूर्वी एल निनोची स्थिती निवळून न्यूट्रल स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. ही स्थिती पुढील मान्सूनसाठी शेतकऱ्यांना दिलासा देणारी ठरू शकते.

## चक्कर येऊन ३६ वर्षीय मजुराचा मृत्यू

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चालत असताना अचानक चक्कर आल्याने खाली पडलेल्या ३६ वर्षीय मजुराचा मृत्यू झाल्याची घटना रात्री घडली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मृताचे नाव माफुया हुसेन शेख सिराजुद्दीन (३६) असे असून, तो मूळचा बशीर येथील रहिवासी होता. तो पनवेल परिसरात मजुरीचे काम करीत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माफुया हुसेन हा चालत जात असताना अचानक चक्कर येऊन जमिनीवर पडला. त्यानंतर त्याला उपचारासाठी रुग्णवाहिकेच्या मदतीने पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद केली.




# लोकअदालत ही न्यायदानाची लोकचळवळ



- न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांचे प्रतिपादन
- रायगडमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन

| अलिबाग | प्रतिनिधी |

सामाजिक अथवा आर्थिक भेदभाव न करता प्रत्येक नागरिकाला सुलभ, परवडणारा आणि प्रभावी न्याय मिळवून देणे हे संविधानाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. न्याय सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचविणारी लोकअदालत ही सर्वसमावेशक लोकचळवळ असल्याचे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा रायगड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती मिलिंद साठ्ये यांनी केले.


रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीचे उद्घाटन न्यायमूर्ती साठ्ये यांच्या हस्ते दृकश्राव्य प्रणालीद्वारे झाले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष एस.बी. अग्रवाल यांच्यासह न्यायिक अधिकारी, विधीज्ञ, पोलीस अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी आणि पक्षकार उपस्थित होते.

प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. बी. अग्रवाल यांनी लोकअदालत ही वाद जलद आणि सौहार्दपूर्ण पद्धतीने निकाली काढण्याची प्रभावी संधी असल्याचे सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रेवती कंटे यांनी 'लोकअदालतीत पराभव कुणाचाच नाही; विजय दोन्ही पक्षांचा' असे सांगत संवाद आणि सामंजस्याचे महत्त्व अधोरेखित केले.

**२७ हजार ८७५ प्रकरणे तडजोडीसाठी**

राष्ट्रीय लोकअदालतीत रायगड जिल्ह्यातील ८ हजार ७०३ प्रलंबित आणि १९ हजार १७२ वादपूर्व, अशी एकूण २७ हजार ८७५ प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली. त्यामुळे पक्षकारांना प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेऐवजी परस्पर सहमतीने वाद निकाली काढण्याची संधी मिळाली.



# बुद्धी दे गणनायका

दहा दिवसांच्या गणपती उत्सवाला आजपासून सुरुवात होत आहे. घरोघरी श्रीगणेशाचे आगमन झाले असेल. मुंबई-पुण्यात असलेले चाकरमानी, मुले, नातवंडे कोकणात सर्वत्र घरी आले असतील. महाराष्ट्र सरकारद्वारा प्रायोजित मुंबई-गोवा रस्त्यावरची कोंडी आणि खड्डे नावाच्या भयानक थरारपटाचा जिवंत अनुभव घेऊन ही मंडळी आली असतील. काही अधिक नशीबवान लोक भारतीय रेल्वेने प्रायोजित केलेल्या प्रचंड उशीरा निघालेल्या, जागोजागी थांबणाऱ्या व मेंढरांसारख्या भरलेल्या गाड्यांमधून आले असतील. असो. विघ्नहर्ता गणेशाच्या कृपेने त्यांचे उत्सवाचे दिवस तरी चांगले जावोत. म्हटले तर खासगी आणि म्हटले तर सार्वजनिक असा हा उत्सव आहे. घराघरातून येणारे गणपती हेदेखील त्या एका घरापुरते नसतात. पूर्ण आळीचे, गल्लीचे किंवा गावाचे असतात. त्याच्या आरतीसाठी किंवा त्याची आरास पाहण्यासाठी आजूबाजूचे लोक येतात. या उत्सवाच्या निमित्ताने माणसे एकदुसऱ्यांना भेटतात. सार्वजनिक गणेशोत्सव हा तर बोलून चालून सर्वांचाच असतो. त्यातले नाचगाणी वगैरे मनोरंजनाचा मसाला बाजूला केला तरी अजूनही अनेक मंडळे विधायक काही करण्याचा प्रयत्न करतात. या निमित्ताने सामाजिक विषयांवर भाषणे किंवा जनजागृतीचे उपक्रम होतात. काही ठिकाणी पुस्तकवाटप वगैरेही होते. पण घरगुती असो की सार्वजनिक, या उत्सवात एक गोष्ट समाईक झाली आहे. अनेक वर्षांपासून ती सुरु झाली आणि आता रुढच झाली आहे. त्या उत्सवाचा ताबा व्यापारी किंवा कंत्राटी लोकांनी घेतला आहे. पूर्वी कोकणामध्ये फुलांची आरास हे मोठे वैशिष्ट्य होते. पण आता चायनीज माळा, प्लास्टिकची तोरणे, फुले इत्यादींनी ही कला आणि ही उर्मी मारून टाकली आहे. आता निव्वळ फुलांची आरास करणारी मोजकीच मंडळी उरलेली असतील. गणपतीच्या मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिसच्या, त्याची सजावट प्लास्टिक किंवा थर्माकोलची आणि दिवे, मंद तेवणारे नव्हे तर विजेच्या साह्याने झगमगणारे असे चित्र सर्वत्र दिसते. सार्वजनिक उत्सवांमधील देखाव्यांमध्येही आता वैयक्तिक कौशल्य कमी होत चालले असून यांत्रिक आधार वाढला आहे. पूर्वी मुले सायकलचा जुना टायर हाच गाडीसारखा फिरवत नेत असत. आता चारचाकी गाड्यांसारख्या खऱ्याखुऱ्या पण छोट्या गाड्या मुलांच्या खेळण्यांमध्ये आल्या आहेत. हीच गोष्ट या उत्सवातही झाली आहे.

## स्वत:साठी की व्यापाऱ्यांसाठी?

उत्सव हा नेहमीच्या रुटीन आयुष्यापासून वेगळा असतो. त्याच त्या कंटाळवाण्या, रुक्ष आयुष्यापासूनची ती सुटका असते. उत्सवामध्ये माणसाला स्वतःच्या मनाप्रमाणे काही कलाकुसर करण्याचे, खाणेपिणे करून पाहण्याचे स्वातंत्र्य मिळते. पण आता स्वातंत्र्याचा अवकाश छोटा होत चालला आहे. माणसांनी स्वतः होऊन हे स्वातंत्र्य व्यापारी कंपन्यांकडे गहाण टाकले आहे. गणपतीसाठीचा नैवेद्य, खाणेपिणे हे प्रत्येक कुटुंबाचे स्वतःचे वैशिष्ट्य असते. निदान आजवर तरी ते होते. पण आता मोदक तर सोडाच, पण साधा आरतीच्या वेळचा प्रसादही बाजारातून तयार होऊन येऊ लागला आहे. यामध्ये घरोघरच्या गृहिणींचे श्रम वाचतात हे चांगलेच आहे व त्याचे स्वागतच करायला हवे. पण याचा तोटा असा की वैविध्य हरवत चालत आहे. जे खाण्यापिण्याचे तेच रोषणाईचे किंवा मनोरंजनाचे. पूर्वी गावोगावी भजनी मंडळे होती. त्यात माणसे आपापल्या गळ्याने गात असत. त्यांना ऐकायला लांबलांबहून लोक येत. आता या सर्वांचे सरसकटीकरण झाले आहे. उभ्याआडव्या महाराष्ट्रात आता एकाच प्रकारची गाणी वाजतात. ती वाजवण्यासाठी एकाच तऱ्हेची डॉल्बी सिस्टीम लावली जाते. तिच्या प्रचंड आवाजाने सर्वत्र एकाच प्रकारे माणसे बहिरी होतात. त्याबद्दल सर्वत्र एकाच रीतीने खासगीत नाराजी व्यक्त होते. पण पोलिस आणि यंत्रणा त्याकडे सरसकट सारखेच दुर्लक्ष करतात. मग माणसे हा त्रास विनातक्रार सहन करतात. जणू ते आरास विकणारे व्यापारी, घाऊकमध्ये यंत्रावर मोदक बनवणारे मिठाईवाले आणि कर्ज काढून डॉल्बी घेतलेले साऊंड सिस्टीमवाले दुकानदार यांना पैसे मिळावेत म्हणूनच लोक उत्सव साजरा करताहेत की काय असे वाटावे अशी ही स्थिती आहे. यामध्ये माणसांचे, प्रत्येक कुटुंबाचे असे स्वतःचे फार कमी कमी होत चालले आहे. पैशाने विकत घेतल्या जाणाऱ्या गोष्टींचा वरचष्मा होतो आहे. ज्याच्याकडे जसे पैसे असतील त्यानुसार या गोष्टींची खरेदी कमी किंवा जास्त इतकाच फरक.

## आनंदासाठी की दाखवण्यासाठी?

गणपती ही एक बुध्दीची देवता आहे.म्हणूनच बुध्दी दे गणनायका ही प्रार्थना सार्वत्रिक आहे. पण बुध्दी म्हणजे निव्वळ गणिते सोडवण्याची कला नव्हे. मेडिकल, इंजिनिअरिंग किंवा आयटीच्या परिक्षेत चांगले गुण मिळवण्याचे कसब म्हणजेही बुध्दी नाही. बुध्दीमध्ये तर्क, सारासार विवेक आणि विचार करण्याची शक्तीही गृहित आहे. आपण ज्या प्रकारे गणेशोत्सव साजरा करतो त्यात आपल्याला खरोखर आनंद मिळतो काय याचाही आपण कधीतरी विचार करायला हवा. पुण्यात विद्यानंद बापट यांनी डीजेचा आवाज बंद करायला सांगितल्यावर लोकांनी त्यांच्यावर टीका केली. बापट हे धर्माच्या विरोधात बोलतात, गणपती ही आपली धार्मिक परंपरा आहे असे हे टीकाकार म्हणाले. ही टीका बुध्दी नसल्याचे लक्षण होते. बापट उत्सवातील आवाजाबद्दल बोलत आहेत. या आवाजाचा सर्वांनाच त्रास होतो. अगदी डॉल्बीमालकाच्या घरातले लोकही यात आलेच. त्याविषयी बोलणे, विचार करणे आणि चुकीच्या गोष्टी बदलणे ही म्हणजेच बुध्दी. यामध्ये धर्माचा काही संबंध नाही. खरे तर चायनीज प्लास्टिकच्या स्वस्त वस्तू आणि थर्माकोल हाच धर्माचा अपमान म्हणायला हवा. कारण तो प्रदूषण करतो. कोकणाच्या सौंदर्याला नष्ट करतो. गणेश पूजन हे समजा दोन हजार वर्षांपूर्वी सुरू झाले असेल तर तेव्हा प्लास्टिक किंवा थर्माकोल नव्हते. त्यामुळे त्यांना आपण जसे परंपरा मानता कामा नये तसेच डॉल्बी हेही आपल्या परंपरेचा भाग नाही. ती जर चूक असेल तर त्यात दुरुस्ती करून पुढे जायला हवे. पण आता हे उत्सव हा काही लोकांचा धंदा झाला आहे आणि काही जणांच्या राजकारणाचे साधन. त्यामुळे ते याच रीतीने चालत राहावेत यासाठी हे लोक सामान्यांच्या धार्मिक भावनांना हात घालत राहतात. या नफेखोर व्यापारी आणि राजकीय मंडळींना थारा द्यायचा नाही असा निर्णय करणे व तो अमलात आणणे हे बुध्दीचे काम आहे. हीच बुध्दी गणनायकाने लोकांना द्यावी अशी प्रार्थना आहे. अलिकडे सोशल मिडियाने आपल्या सर्वांना गुलाम केले आहे. त्यामुळे दाखवेगिरी नावाच्या प्रकाराला फार महत्व आले आहे. उत्तम हॉटेलमध्ये आपण जेवायला जातो. पण पदार्थ समोर आल्यावर ते खाऊन बघण्याऐवजी आधी त्याचा फोटो काढला जातो. त्याच्यासोबत रील तयार केले जाते. ते शेअर केले जाते. पुढच्या काही मिनिटात त्याला किती लाईक मिळाले याची चिंता अधिक केले जाते. हे लाइक्स कमी असतील तर समोर असलेले पदार्थ आपल्याला गोड लागत नाहीत. हीच स्थिती गणपतीसारख्या उत्सवांचीही झाली आहे. गावाला जाऊन गणेशोत्सव साजरा करतो हे दाखवण्याची स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे. त्यामुळे त्यातला झगमगाट, खर्च आणि आवाज वाढत चालला आहे. गणेशाने याबाबतच सर्वांना बुध्दी द्यावी. सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा.

**| विचार**

# प्रश्न आरक्षणाच्या न्याय्य रचनेचा

***आज देशासमोर आरक्षणाची रचना अधिक न्याय्य कशी करावी, हा प्रश्न आहे. सर्वाधिक वंचितांपर्यंत आरक्षणाचा लाभ कसा पोहोचेल, उपवर्गीकरणाची गरज कुठे आणि कोणत्या आधारावर आहे, 'क्रिमी लेअर'चे निकष कसे असावेत, सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाचे मोजमाप कसे करायचे, खासगी क्षेत्रात वाढत्या रोजगारसंधींच्या पार्श्वभूमीवर सामाजिक प्रतिनिधित्वाचा प्रश्न कसा हाताळायचा, हे सर्व प्रश्न अधिक गंभीर आहेत.***




**शिवाजी कराळे**

भारतीय लोकशाही, समाजव्यवस्था आणि राजकारण यांच्या केंद्रस्थानी असलेला 'आरक्षण' हा विषय पुन्हा एकदा एका अत्यंत गुंतागुंतीच्या आणि संवेदनशील वळणावर येऊन ठेपला आहे. एका बाजूला गुणवत्तेचा संकोच होत असल्याचा आणि जातीनिहाय आरक्षणाची कालबाह्यता सिद्ध करण्याचा दावा करत आरक्षणाविरोधात देशभरात उमटणारे असंतोषाचे सूर आहेत, तर दुसऱ्या बाजूला शतकानुशतके वंचित राहिलेल्या घटकांना आजही विकासाच्या मुख्य प्रवाहात पुरेशी जागा न मिळाल्याने आरक्षणाचे कवच अधिक मजबूत करण्याची मागणी होत आहे. यातच भर म्हणून अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याची गरज, त्यातून निर्माण झालेले सामाजिक वादंग आणि 'क्रिमी लेअर'च्या मुद्द्यावर सरकारची सर्वोच्च न्यायालयातील भूमिका या सर्व घडामोडींनी भारताच्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला नव्याने आव्हान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात आरक्षणाची तरतूद करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि घटनाकारांनी केवळ आर्थिक मदतीचा विचार केला नव्हता, तर सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि संधींचा अभाव या ऐतिहासिक अन्यायाचे परिमार्जन करण्याचे ते एक साधन मानले होते; मात्र आज सात दशकांनंतरही आरक्षण हा केवळ सामाजिक न्यायाचा मार्ग उरला नसून तीव्र राजकीय, वैचारिक आणि भावनिक संघर्षाचा आखाडा बनला आहे. देशभरात वेळोवेळी आरक्षणविरोधी आंदोलने उभी राहतात. विशेषतः खुल्या प्रवर्गातील तरुणांमध्ये सरकारी नोकऱ्यांचा तुटवडा आणि उच्च शिक्षणातील मर्यादित जागा यांमुळे तीव्र नैराश्य निर्माण झाले आहे.

आजघडीला अधिक गुण मिळवूनही केवळ जातीच्या निकषामुळे संधी हुकते, अशी भावना निर्माण झाल्याने गुणवत्ता विरुद्ध आरक्षण असा संघर्ष उभा केला जातो. आरक्षणाचा फायदा ठरावीक सधन कुटुंबांपर्यंतच मर्यादित राहिला असून खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचत नाही, त्यामुळे जातीऐवजी केवळ आर्थिक निकषावर आरक्षण असावे किंवा आरक्षण पूर्णपणे रद्द करावे, असा युक्तिवाद या आंदोलनांमधून सातत्याने मांडला जातो. आर्थिक दुर्बल घटकांसाठी दहा टक्के आरक्षण लागू झाल्यानंतरही आरक्षणाची व्यवस्था संपूर्णपणे संपवण्याची मागणी काही घटकांकडून जोर धरताना दिसते; मात्र भावना आणि राजकीय वक्तव्ये बाजूला ठेवून वास्तवाचा विचार केला, तर प्रत्यक्षात आरक्षण रद्द करणे हे घटनात्मक, कायदेशीर आणि सामाजिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचे आणि जवळपास अशक्यप्राय पाऊल आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम १५ आणि १६ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी विशेष तरतुदींचा अधिकार दिला आहे. समाजात जातीव्यवस्था, अस्पृश्यतेचे सूक्ष्म स्वरूप आणि सामाजिक उतरंड अस्तित्वात असेपर्यंत आरक्षण ही केवळ आर्थिक सवलत नसून प्रतिनिधित्व देण्याचे माध्यम ठरते. शिवाय, भारतातील लोकसंख्येचा मोठा भाग हा मागासवर्गीय प्रवर्गात मोडतो. अशा स्थितीत आरक्षण रद्द करण्याचा कोणताही निर्णय देशात प्रचंड मोठा सामाजिक असंतोष आणि कायदा-सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण करू शकतो. राजकीयदृष्ट्या तर कोणताही पक्ष अशी भूमिका घेण्याचे धाडस करू शकत नाही.आरक्षण अजूनही का गरजेचे आहे, याचे ठोस उत्तर नुकत्याच समोर आलेल्या विविध संसदीय समित्यांच्या आणि आयोगांच्या अहवालांतमधून स्पष्ट होते. संसदीय समित्यांनी वारंवार निदर्शनास आणून दिले आहे, की उच्च शिक्षण, न्यायव्यवस्था, वरिष्ठ नोकरशाही आणि विद्यापीठे यांमधील उच्च पदांवर आजही अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नगण्य आहे. अ आणि ब वर्गातील केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये अनेक पदे आजही रिक्त आहेत किंवा त्या ठिकाणी मागास घटकांची संख्या अत्यल्प आहे. खासगी क्षेत्रात आरक्षणाची तरतूद नसताना सरकारी क्षेत्रातील संधी सातत्याने आक्रसत आहेत. अशा वेळी आरक्षण काढून घेतल्यास शतकानुशतके शोषित राहिलेल्या समाजाला पुन्हा एकदा अंधारात ढकलल्यासारखे होईल, असा स्पष्ट इशारा संसदीय अभ्यासातून मिळतो. आरक्षण ही 'गरिबी हटाव' योजना नसून निर्णयप्रक्रियेत आणि सत्तेत भागीदारी देणारी व्यवस्था आहे, हे विसरून चालणार नाही. सध्याच्या आरक्षणाच्या चर्चेत सर्वाधिक स्फोटक ठरलेला मुद्दा म्हणजे उपवर्गीकरणाची मागणी. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने राज्यांना अनुसूचित जाती आणि जमातींमध्ये उपवर्गीकरण करण्याची मुभा देणारा महत्त्वपूर्ण निकाल दिला. या निकालामुळे दलित चळवळीत आणि वंचित समाजात दोन स्पष्ट प्रवाह निर्माण झाले आहेत. एका प्रवाहाचे म्हणणे असे आहे, की अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या काही विशिष्ट जातींनीच आरक्षणाचा मोठा हिस्सा व्यापला असून, त्या प्रवर्गातील अधिक दुर्बल, अत्यंत मागास आणि वंचित जाती अजूनही मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत. त्यामुळे 'मागासांमधील अतिमागास' घटकांसाठी कोट्यांतर्गत कोटा म्हणजेच उपवर्गीकरण आवश्यक आहे, असा आग्रह हा वर्ग धरतो. तेलंगणामधील मादिगा समाज किंवा उत्तरेतील वाल्मिकी समाजासारख्या घटकांनी यासाठी प्रदीर्घ लढा दिला आहे. याउलट, उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्या घटकांचे म्हणणे आहे, की असा निर्णय दलित एकतेला सुरुंग लावणारा आहे. संविधानाने अनुसूचित जाती हा एकसंध वर्ग मानला आहे, त्यात उपवर्ग तयार केल्याने जातीजातींमधील दरी वाढेल, तसेच सत्ताधारी वर्गाला 'फोडा आणि झोडा' नीती वापरणे सोपे जाईल. उपवर्गीकरणाच्या विरोधात विविध दलित संघटनांनी देशभरात 'भारत बंद' आणि आंदोलनांची हाक देऊन आपला तीव्र रोष व्यक्त केला होता. त्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर न राहता थेट सामाजिक संघर्षाचे रूप धारण करत असल्याचे चित्र दिसत आहे. याच वादाला जोड मिळाली ती 'क्रिमी लेअर'च्या मुद्द्याची. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील काही न्यायमूर्तींनी अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणातही 'क्रिमी लेअर' (सधन वर्ग) लागू करण्याची आवश्यकता व्यक्त केली होती. इतर मागासवर्गीयांप्रमाणे (ओबीसी) अनुसूचित जाती-जमातींमधील सधन आणि उच्च पदांवर पोहोचलेल्या कुटुंबांच्या मुलांना आरक्षणातून वगळले पाहिजे, जेणेकरून खऱ्या वंचित पिढ्यांना संधी मिळेल, असा युक्तिवाद न्यायालयातून आला; मात्र या मुद्द्यावर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आणि संसदेत घेतलेली भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली. सरकारने ठामपणे स्पष्ट केले, की अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी 'क्रिमी लेअर' लागू करण्याचा कोणताही विचार नाही आणि संविधानातील मूळ तरतुदींनुसार त्यांना हे संरक्षण कायम राहिले पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या चौकटीत या घटकांवरील सामाजिक कलंक आणि भेदभावाची तीव्रता ही केवळ आर्थिक प्रगतीने संपत नाही. एखादी व्यक्ती आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली किंवा मोठ्या पदावर गेली, तरी समाजात तिच्या जातीवरून होणारा दुजाभाव पूर्णपणे नष्ट होत नाही, हे वास्तव सरकारने मान्य केले. परिणामी, राजकीय आणि सामाजिक दबाव लक्षात घेऊन सरकारने 'क्रिमी लेअर'च्या कल्पनेपासून स्वतःला दूर ठेवणे पसंत केले. आज आरक्षण हा विषय केवळ समर्थन आणि विरोध या दोन टोकांवर विभागला गेला आहे. खुल्या प्रवर्गाची असुरक्षितता, मागास घटकांची अस्तित्वाची लढाई आणि उपवर्गीकरणाच्या निमित्ताने अंतर्गत वाटपावरून उफाळलेला वाद यामुळे सामाजिक सौहार्द धोक्यात येत आहे. मूळ अडचण ही आहे, की देशात पुरेसा रोजगार आणि दर्जेदार शिक्षणाच्या संधी निर्माण होत नसल्याने आरक्षणावरील ताण प्रचंड वाढला आहे. उपलब्ध संधी मर्यादित आणि आकांक्षी तरुणांची संख्या अमाप, अशी स्थिती असल्याने आरक्षणाला एकमेव तारणहार मानले जात आहे. केवळ आरक्षण रद्द करण्याची मागणी करणे जसे वास्तवाला धरून नाही, तसेच आरक्षणातील त्रुटींकडे डोळेझाक करणेही शहाणपणाचे ठरणार नाही. गुणवत्तेचा सन्मान करतानाच सामाजिक न्यायाचे अधिष्ठान कायम राखले जात नाही, तोपर्यंत हा तिढा सुटणे कठीण आहे. आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत कसा पोहोचेल, जातनिहाय सामाजिक वास्तव काय आहे आणि त्याच वेळी खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय कसा देता येईल, या मुद्द्यांचा समतोल साधण्याची गरज आहे.

**| चर्चा आजची**

# गणपती बाप्पा आले हो!

**राकेश लोहार**

चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा स्वामी, सुखकर्ता-दुःखहर्ता, विघ्नहर्ता साक्षात गणपती बाप्पाचे आज पृथ्वीतलावर आगमन झाले आहे. बाप्पाच्या आगमनाने घराघरांत आनंदाची, उत्साहाची आणि भक्तीची लहर पसरली आहे. गेले कित्येक दिवस बाप्पाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या गणेशभक्तांचा उत्साह आज शिगेला पोहोचला आहे. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण, 'गणपती बाप्पा मोरया... मंगलमूर्ती मोरया'चा जयघोष आणि भक्तीमय वातावरणाने सर्वत्र गणेशमय वातावरण निर्माण झाले आहे.



विघ्नहर्ता बाप्पा घरोघरी विराजमान झाल्याने आपल्या आयुष्यातील संकटे, अडचणी आणि विघ्ने दूर होतील, अशी प्रत्येक भक्ताची मनापासून श्रद्धा आहे. पुढील दहा दिवस बाप्पा आपल्या घरी पाहुणे म्हणून मुक्काम करणार आहेत. भक्तांच्या प्रेमाचा, श्रद्धेचा आणि भक्तीचा पाहुणचार घेऊन ते पुन्हा आपल्या घरी परतणार आहेत. त्यामुळे हे दहा दिवस केवळ उत्सवाचे नाहीत, तर आनंदाचे, हर्षाचे आणि एकोप्याचेही असणार आहेत.

पूर्वीचा गणेशोत्सव आठवला की आजही अनेकांच्या चेहऱ्यावर हास्य उमटते. घरातील मातीचा छोटासा गणपती, साधी आरास, फुलांची सजावट, घरगुती नैवेद्य, सायंकाळची आरती आणि घराघरांतून येणारा टाळ-मृदुंगाचा आवाज... यातच गणेशोत्सवाचे खरे सौंदर्य सामावलेले होते. सुख-दुःख विसरून एकमेकांच्या घरी जाणे, आरतीला उपस्थित राहणे, प्रसाद घेणे आणि गप्पांच्या मैफली रंगवणे, हीच त्या उत्सवाची खरी ओळख होती. काळ बदलला, जीवनशैली बदलली आणि गणेशोत्सवाचे स्वरूपही काही प्रमाणात बदलले. आज मोठ मोठ्या गणेशमूर्ती, आकर्षक सजावट, रोषणाई, देखावे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्सवाला भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडियावर बाप्पाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंतचे क्षण टिपले जातात. मात्र, या बदलत्या काळातही गणेशोत्सवाची खरी ताकद आजही तशीच आहे; ती म्हणजे, श्रद्धा, संस्कार, एकोपा आणि माणुसकी.

आजचा सामान्य माणूस अनेक विघ्नांशी झुंजत आहे. महागाईने घरखर्चाचे गणित बिघडले आहे. शिक्षणाचा वाढता खर्च, आरोग्याच्या समस्या, रोजगाराची चिंता, शेतीसमोरील संकटे, वाढती स्पर्धा आणि सततचा मानसिक ताण यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात काही ना काही संघर्ष सुरू आहे. शेतकरी कधी अतिवृष्टीशी, तर कधी पावसाच्या दडीशी लढतो. नोकरदार माणूस नोकरी टिकविण्याच्या आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्याच्या विवंचनेत आहे. तरुणांच्या डोळ्यांत मोठी स्वप्ने आहेत; मात्र त्या स्वप्नांना योग्य दिशा आणि संधी मिळण्याची चिंता आहे.

निसर्गही कधी अवकाळी पाऊस, कधी पूर, कधी दुष्काळ तर कधी वादळाच्या रूपाने नवनवीन आव्हाने उभी करतो. रस्ते, वाहतूक, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार अशा मूलभूत प्रश्नांशी सामान्य माणसाची रोजची झुंज सुरू आहे. या सगळ्या विघ्नांच्या काळात भक्तांच्या मनाला आधार देणारा एकच विश्वास आहे; तो म्हणजे, 'बाप्पा आहे ना!'

म्हणूनच गणपती बाप्पाचे आगमन हे केवळ एका मूर्तीचे आगमन नसते. ते आशेचे आगमन असते. संकटांशी दोन हात करण्याची नवी उमेद देणारे हे आगमन असते. अडचणी कितीही मोठ्या असल्या तरी त्यातून मार्ग काढण्याचे बळ देणारा हा उत्सव असतो. बाप्पाच्या चरणी माथा टेकताना प्रत्येक भक्त आपल्या मनातील चिंता, दुःख आणि अपेक्षा त्यांच्याकडे सोपवतो.

गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणणारा उत्सव आहे. जात-पात, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा असा कोणताही भेद न ठेवता सर्वजण बाप्पाच्या चरणी एकत्र येतात. आरतीच्या वेळी एकाच सुरात उमटणारा 'सुखकर्ता दुःखहर्ता'चा जयघोष आपल्याला माणुसकीची आणि एकतेची जाणीव करून देतो. त्यामुळे या दहा दिवसांत केवळ बाप्पाची पूजा न करता त्यांच्या शिकवणीचा अंगीकार करणेही गरजेचे आहे. गणपती बाप्पा आपल्याला बुद्धी, विवेक आणि संयम देतात. त्यामुळे उत्सव साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे, ध्वनिप्रदूषण टाळणे, गरजूंच्या मदतीला धावून जाणे, अन्नाची नासाडी टाळणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, हीच बाप्पाची खरी सेवा ठरेल. आपल्या आनंदात दुसऱ्याच्या चेहऱ्यावरही हास्य फुलले, तरच गणेशोत्सव खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. पुढील दहा दिवस आरतीचे, भजनांचे, कीर्तनांचे आणि भक्तीगीतांचे सूर सर्वत्र घुमतील. घराघरांत मोदकांचा सुगंध दरवळेल. लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद असेल, तर मोठ्यांच्या मनात जुन्या आठवणींची पालखी निघेल. काही क्षणांसाठी का होईना, रोजच्या धावपळीतील चिंता बाजूला सारून प्रत्येक जण बाप्पाच्या भक्तीत रमून जाईल.

आज बाप्पा आले आहेत. आपल्या घरात, मनात आणि समाजातही. त्यांच्या चरणी एकच प्रार्थना आहे की, या जगातील सर्व विघ्ने दूर करावीत. शेतकऱ्याला सुखाचे दिवस मिळावेत, तरुणांना रोजगार मिळावा, कष्टकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळावा, प्रत्येक घरात आरोग्य आणि आनंद नांदावा आणि समाजात प्रेम, बंधुभाव व माणुसकी वाढावी. कारण, बाप्पा म्हणजे केवळ उत्सव नाही; बाप्पा म्हणजे विश्वास! बाप्पा म्हणजे आशा! बाप्पा म्हणजे संकटांवर मात करण्याची शक्ती! म्हणूनच आज प्रत्येकाच्या ओठांवर एकच जयघोष आहे; गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया!

**लोकसंसद**

## ब्रिक्स परिषदेतील भारताचे यश ...

ब्रिक्स परिषद नवी दिल्ली येथे चालू असून, त्यास रशिया, चीन, इराण तसेच इतर अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर आहेत. बांगलादेशाचे प्रतिनिधी मात्र अनुपस्थित आहेत. या परिषदेत भारताने आपली भूमिका ठामपणे मांडली आहे. पंतप्रधान मोदी यांनी ब्रिक्स परिषदेचे उद्घाटन करताना जागतिक कारभाराची सध्याची स्थिती बदलून भागीदारीचे व्यासपीठ उभारण्याची गरज प्रतिपादन केली. जागतिक कारभार सुधारण्याचा १० कलमी कार्यक्रमसुद्धा मांडला. वास्तविक, जगातील अनेक संकटांचा सामना विकसनशील देशावर होत असताना या देशांना निर्णयात फारसे महत्त्व दिले जात नसल्याबद्दल मोदी यांनी सांगितले व या देशांना निर्णय प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान मिळावे, असे प्रतिपादन केले. जागतिक व्यापारात खलाशांची भूमिका महत्त्वाची आहे, असे ते म्हणाले. पश्चिम आशियातील संघर्ष, दहशतवाद व्यापारातील अडथळे यावर ब्रिक्स परिषदेने सामूहिक भूमिका स्पष्ट केली आहे. पहेलगाम हल्ल्याची घटना याबद्दल परिषदेने निषेध व्यक्त केला. या हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता. हा भारताच्या भूमिकेचा मोठा विजय म्हणावा लागेल. दहशतवादाचा संबंध कोणत्याही गोष्टींशी जोडला जाऊ नये व या वर कायद्यानुसार मागणी या परिषदेत करण्यात आली. भारत-चीन संबंध धोरणात्मक दृष्टीकोनातून पुढे नेण्याची गरज सांगताना पंतप्रधान मोदी यांनी दोन्ही देशांमधील मतभेद हे विवादात रूपांतरित होऊ नयेत असा संदेश मोदी यांनी चीनचे राष्ट्रध्यक्ष शी जिनपिंग यांना दिला. सीमेवरील शांतता महत्त्वाची आहे, असे मोदींनी सांगितले. एकतर्फी शुल्क लावणे व बिगरशुल्क व्यापार उपायावर चिंता व्यक्त करण्यात आली.


**- शांताराम वाघ पुणे**

**| दिनविशेष**

# श्री गणेश चतुर्थी

गणेश चतुर्थी हा भारतातील, विशेषतः महाराष्ट्रातील, सर्वांत महत्त्वाचा आणि मोठ्या जल्लोषाने साजरा केला जाणारा सण आहे. गणेश यांना विघ्नहर्ता आणि बुद्धीप्रदाता मानले जाते. हा सण फक्त भक्तीचा नव्हे, तर एकतेचा, संस्कृतीचा आणि पर्यावरणाच्या जाणीवेचा उत्सव आहे. गणेश चतुर्थी हा महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि आनंददायक सण आहे. हा सण भक्तिभावाने साजरा केला जातो. गणेश चतुर्थीच्या दिवशी, घरांमध्ये किंवा सार्वजनिक मंडळांमध्ये गणपतीची मूर्ती स्थापित केली जाते. मूर्तीच्या स्थापनेसह, भक्त जन नियमितपणे पूजा आणि आरती करतात. रोज सकाळ आणि संध्याकाळी आरती केली जाते, ज्यामध्ये विशेषतः ''सुखकर्ता दुःखहर्ता'' ही आरती अत्यंत महत्त्वाची मानली जाते. ही आरती गणेश भक्तांच्या हृदयाला शांतता आणि सुख देते.

गणेश चतुर्थीचा उत्सव सांस्कृतिक कार्यक्रमांनीही समृद्ध असतो. विविध ठिकाणी नृत्य, नाटक आणि गणेशोत्सव स्पर्धांचे आयोजन केले जाते, ज्यामुळे संपूर्ण वातावरण आनंदाने भरलेले असते. ह्याच्या समारोपासाठी, अनंत चतुर्दशीला गणपती मूर्तीचा विसर्जन सोहळा मोठ्या



उत्साहाने साजरा केला जातो. ''गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'' असा जयघोष करत भक्त गणपतीची मूर्ती नदीत किंवा तलावात विसर्जित करतात. हा सण एकत्र येऊन आनंद साजरा करण्याचा, आणि गणेशाच्या कृपाशी संपूर्ण वर्षभर सुख, समृद्धी आणि आशीर्वाद प्राप्त करण्याचा एक महत्वाचा दिवस आहे.

शिवपुराणानुसार महादेव आणि पार्वती देवीचा पुत्र गणेश.. या गणेशजन्माची रंजक कथा अशी की, पार्वती देवीने गणेशाची सुंदर मूर्ती घडवून त्यात प्राण फुंकले आणि गणपतीचा जन्म झाला, एके दिवस पार्वती स्नानासाठी जात असताना प्रवेशद्वारापाशी थांबण्याची सूचना गणेशाला केली. आईचा आदेश मानून गणपती व्दाराजवळच बसून राहिला. तेवढ्यात महादेव शिवशंकर तेथे आले. गणपती हा आपलाच पुत्र असून, पार्वती देवीच्या आदेशावरूनच गणेश तेथे असल्याची कल्पना त्यांना नव्हती. महादेवांनी आत जाण्याचा प्रयत्न केला असता, गणपतीने त्यांना अडवले. सुरुवातीला एक बालक म्हणून महादेवांनी त्याला समजावले. मात्र, गणेशाने ते ऐकले नाही. आईची आज्ञा पाळण्याचा संकल्पच त्याने घेतला होता. महादेवांनी गणपतीला समजावले. मात्र, तो हटला नाही. शेवटी पिता-पुत्रामध्ये युद्ध झाले. आणि महादेवांनी त्रिशुळाचा गणपतीवर जोरदार प्रहार केला. या प्रहारामुळे गणपतीचे मूळ शीर धडावेगळे झाले. काही वेळाने पार्वती देवी तेथे आली. गणपतीला निपचित पडलेले पाहून त्या प्रचंड दुःखी झाल्या. अत्यंत क्रोधीत झाल्या. माझ्या पुत्राला पुन्हा जीवंत केले नाही, तर संपूर्ण पृथ्वीचा विनाश करेन, असे पार्वतीने महादेवांना सांगितले. त्यानंतर शंकरांनी तातडीने नंदी व अन्य गणांना जंगलात पाठविले. बऱ्याच वेळानंतर अखेर त्यांना एक हत्ती दिसला. त्याचे मस्तक घेऊन ते शंकरांकडे आले. महादेवांनी हत्तीचे मस्तक त्या बालकांच्या धडाला जोडले आणि त्याला जीवनदान दिले. यानंतर सर्व देवांनी गणपतीला प्रथम पूजनीयचे वरदान दिले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे
१४ सप्टेंबर
१) श्री.सदानंद जनार्धन टिळू थळ-बाजार, अलिबाग, दि.१४-९-१९५१
२) श्रीम. जयश्री कांतीलाल गांधी श्रीबाग नं.३अलिबाग, दि.१४-९-१९५८
३) श्री. सदाशिव तुकाराम पाटील कोळीवाडा, अलिबाग, दि.१४-९-१९५९

# जेट्टी, पोचरस्त्यांसाठी १७० कोटी

● कोकणातील १०४ कामांना गती; रायगड, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्गातील प्रकल्पांचा समावेश

। रायगड । प्रतिनिधी ।

**किनारपट्टीच्या विकासासाठी जेट्टी उभारणी आणि जेट्टीपर्यंतच्या रस्त्यांच्या कामांना गती देण्यासाठी राज्य सरकारने १७० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मुंबईसह कोकणातील १०४ कामांसाठी हा निधी देण्यात आला असून, जेट्टी, पोचरस्ते, संरक्षक भिंती, धूपप्रतिबंधक बंधारे, गाळ काढणे आणि प्रवासी सुविधांची कामे त्यातून केली जाणार आहेत. यातील ७५ कामांसाठी १२६ कोटी, तर बंदरांपर्यंत रस्ते, रेल्वेमार्ग आणि बॅकवॉटर विकासाच्या २९ कामांसाठी ४४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**



महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डास सहायक अनुदान, तरंगती जेट्टी व तत्सम प्रवासी सुविधा पुरवणे या योजनेतंर्गत ७५ कामांकरिता ५७७ कोटी ५३ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मार्च २०२६ अखेर या कामांसाठी १३३ कोटी ९२ लाख रुपये वितरित झाले असून, २०२६-२७ मध्ये आणखी १२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ही कामे होतील.

रायगडमधील प्रकल्पांना निधी रायगडमधील जेट्टी आणि त्यांच्याशी संबंधित सुविधांना प्राधान्य दिले गेले आहे. वसोली येथील रो-रो जेट्टी, पोचरस्ता, गाळ काढणे आणि दगडी बंधाऱ्याची दुरुस्ती, तसेच आक्षीसागर येथील जेट्टी, पोचरस्ता, गाळ काढणे आणि अन्य सुविधांसाठी प्रत्येकी १२ कोटी रुपयांची तरतूद आहे. आक्षीसागरमध्ये २० टक्के कामे झाली असून रेवस जेट्टी परिसरातील वाहनतळ आणि स्वच्छतागृहाचे कामही केवळ ३० टक्के झाले आहे. या योजनेअंतर्गत पालघरमध्ये शंकर मंदिर-दांडा, पांजू, चिंचणी, सतपती, वडराई, खारेकुरण, वडिव, राजोडी, कळंब आणि नारंगी रो-रो जेट्टीकडे जाणाऱ्या रस्त्यांचे मजबुतीकरण होईल. काही कामांची प्रगती ९० ते १०० टक्क्यांवर पोहोचली असली तरी पिंपळनेर येथील खाडीकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम रखडले आहे.

रायगडमधील रेवदंडा रो-रो जेट्टी, अलिबाग, धरमतर, महाड, मुरूड, नागाव आणि करंजा परिसरातील पोचरस्त्यांची कामे, तर रत्नागिरीतील बंदरांतर्गत रस्ते आणि राजीवाडा येथील बंधाऱ्याचे कामही या योजनेत आहे. १४३ कोटी ९७ लाख खर्चून राजीवाडा बंधारा बांधला जाणार आहे. हे काम २५ टक्क्यांवर झाले आहे.

### बंदरांपर्यंतचे रस्ते

या कामाना पूरक अशा रस्त्यांकरिता परिवहन विभागाने बंदरापर्यंत रस्ते, रेल्वेमार्ग बांधणे आणि पश्चजल (बॅकवॉटर) विकास या योजनेंतील २९ कामांसाठी ४४ कोटी रुपये मंजूर केले आहेत. याकरिताही ५१७ कोटी ४५ लाख रुपयांची तरतूद असून त्यापैकी साधारण ११४ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढिया स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजार पेठ अलिबाग**



**सुनंदा नारायण नाईक, प्रथम स्मृतिदिन चौल बेलाई, अलिबाग**



## चिमुकल्यांनी आणले गणराया

। सुतारवाडी । प्रतिनिधी ।

डॉ. जी आर राजे प्री. प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडी च्या चिमुकल्यांनी आकर्षक गणराया तयार करून आपल्या स्कूलमध्ये गणरायाची स्थापना केली. घरून प्रत्येकाने आपल्या गणरायाला वाजत गाजत आनंदाने स्कूलमध्ये आणले.

टेबलावर सर्वांनी एकत्रपणे गणरायांच्या मूर्ती ठेवल्यानंतर आरती पूजा करून गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया असे म्हणून गणरायाची विविध प्रकारची गीते म्हटली. मुलांनी रंगीत कुर्ता-पायजमा, मुलींनी नऊवारी साडी घागरा तसेच विविध रंगीत प्रकारचा पोशाख केला होता. गणरायाचे आगमन आणि शिक्षक दिनाचे औचित्य साधून मोहन फडणीस यांनी स्कूल साठी दहा हजार रुपयाची देणगी दिली. दत्तात्रेय बेंद्रे यांनी १००० रुपये, अविनाश नाईक यांनी एक हजार रुपये स्कूलसाठी देणगी दिली. तर संजय मुंबरे यांनी लहान मुलांसाठी २५ विविध प्रकारची खेळणी, लियाकत कडवेकर यांनी टेबलावरील काच व पाच खुर्च्या तसेच सुनील उशीरकर यांनी राइक व स्पीकर स्कूल साठी दिले. या सर्वांचे स्कूलचे संस्थापक डॉ. रमेश राजे यांनी विशेष आभार मानले.

## आदिती तटकरे यांच्या हस्ते गणपती विसर्जन घाटाचे लोकार्पण

। म्हसळा । प्रतिनिधीं ।

म्हसळा येथील जानसई नदी सुशोभीकरण प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात साकारण्यात आलेल्या गणपती विसर्जन घाटाच्या पायऱ्यांचे लोकार्पण नामदार आदिती तटकरे यांच्या हस्ते आज उत्साहात करण्यात आले.



जानसई नदी सुशोभीकरण प्रकल्पाचे काम सुरू असताना मागील वर्षी गणपती विसर्जनाच्या वेळी भाविकांना काही अडचणींचा सामना करावा लागला होता. ही बाब लक्षात घेऊन यंदा गणेशभक्तांना विसर्जनाच्या वेळी कोणत्याही गैरसोयीला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक त्या उपाययोजना केल्याचे समाधान व्यक्त केले.

■ **जानसई नदी सुशोभीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण**

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी महेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी योगिता कुटे, पंचायत समिती सभापती बबन मनवे, रायगड जिल्हा परिषद सदस्य अभिषेक विचारे, जिल्हा परिषद सदस्य अनिल बसवत, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, नाजीम हसवारे, नगराध्यक्ष सुनील शेडगे, संजय कर्णिक, उपसभापती लहुशेठ म्हात्रे, मंडळ अधिकारी सलीम शहा, अव्वल कारकून सचिन धोंडगे, हिंदू समाज अध्यक्ष नंदू गोविलकर, सुशील यादव, सरोज म्हशीलकर, भाई बोरकर यांच्यासह नागरिक व मान्यवर उपस्थित होते.

## संदर्भ पुस्तकांच्या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। माणगाव । प्रतिनिधी ।

द. ग. तटकरे महाविद्यालय, माणगाव येथे विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध विषयांवरील संदर्भ पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन उत्साहात आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाशी संबंधित तसेच स्पर्धा परीक्षा, संशोधन व सर्वांगीण ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त संदर्भ साहित्याची माहिती मिळावी, हा या प्रदर्शनामागील प्रमुख उद्देश होता.



माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मोलाच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम साकारला गेला. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.आर. पांडेय आणि उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य यांच्या प्रोत्साहन व सहकार्यामुळे या उपक्रमाला यशस्वी स्वरूप प्राप्त झाले. या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन डॉ. संगिता उतेकर, ग्रंथपाल यांनी केले.

या उपक्रमांतर्गत विविध विभागांसाठी स्वतंत्रपणे संदर्भ पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. १ सप्टेंबर रोजी मराठी विषयावरील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

त्यानंतर ३ सप्टेंबर रोजी इतिहास, भूगोल व इंग्रजी विभागासाठी, ४ सप्टेंबर रोजी माहिती तंत्रज्ञान विभागासाठी, ७ सप्टेंबर रोजी विभागासाठी, ८ सप्टेंबर रोजी वाणिज्य व विभागासाठी ९ सप्टेंबर रोजी हिंदी विभागासाठी आणि १० सप्टेंबर रोजी विज्ञान विभागासाठी संदर्भ पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

प्रदर्शनामध्ये संबंधित विषयांतील विविध संदर्भग्रंथ, पाठ्यपुस्तके, स्पर्धा परीक्षा साहित्य, संशोधनपर पुस्तके तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन उपयुक्त ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध पुस्तकांची पाहणी केली.

## मुलीचा विनयभंग

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिच्यासोबत अश्लील कृत्य केल्याप्रकरणी जाफरअली अनवरअली शेख याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपीने अल्पवयीन मुलीचा सिकेटी कॉलेज ते आसुडगाव येथील घरापर्यंत पाठलाग केला. आणि तिच्या इंस्टाग्राम आयडीवरून संपर्क करून तिला भेटण्यास बोलवले आणि तिच्यासोबत अश्लील चाळे केले. याबाबत आरोपी जाफरअली शेख याला पीडित मुलीच्या भावाने जाब विचारला असता त्याला ठार मारण्याची धमकी दिली.

## ४२ लाख ६४ हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** गेमिंग कंपनीमध्ये गुंतवणूक करून चांगला नफा मिळवण्याचे आश्वासन दिले आणि ४२ लाख ६४ हजारांची फसवणूक केली. या प्रकरणी नवीन डिसूजा, किरण शिंदे, रोहित हाटे, शिवकुमार, विजय शेट्टी, गेमिंग साईटचे निर्माण आणि वापरकर्ते, बँक खातेधारक यांच्या विरोधात सायबर पोलीस ठाण्यात ९ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फॅनरेप डॉट प्रो ही गेमिंग कंपनी रजिस्टर कंपनी असून त्यात गुंतवणूक करून चांगला नफा मिळवण्याचे आश्वासन नवीन डिसूजा यांनी फिर्यादी प्रकाश कमलाकर केणी (राहणार करंजाडे, सेक्टर २ ए) यांना दिले. यावेळी त्यांनी त्या साइटवर रजिस्ट्रेशन केले. डिसुझा याने आणि त्यांच्या साथीदारांनी विविध युपीआय आयडी पाठवून त्यावर ४२ लाख ६४ हजार रुपये रक्कम स्वीकारली. त्यानंतर केणी यांना कोणताही नफा आणि गुंतवलेली रक्कम परत केली नाही. फसवणूक झाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## अश्लील मेसेज करून अल्पवयीन मुलीचा केला पाठलाग, गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीला अश्लील मेसेज करून तिच्या कानाखाली मारली आणि रिक्षामध्ये बसून पाठलाग केल्याप्रकरणी उमेश प्रगणे याच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात पोकसो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

ऑगस्ट २०२५ मध्ये उमेश याने पीडित मुलीच्या इंस्टा आयडीवर मी तुला ओळखतो, आपण फ्रेंडशिप करूया असे बोलून पाठलाग केला आणि फोटो काढून त्रास दिला. त्यानंतर तिने इन्स्टा आयडीवर त्याला ब्लॉक केले. त्यानंतर मोबाईल नंबरच्या व्हाट्सअप वर अश्लील मेसेज केले आणि तुला मारेल असे धमकावले. तसेच तिच्या आई-वडिलांना फोन करून शिवीगाळ केली.

त्यानंतर ८ सप्टेंबर रोजी सकाळी पावणेसहाच्या सुमारास पीडित मुलगी शाळेला जात असताना तिच्या कानाखाली मारली आणि धक्का दिला व ती बसलेल्या रिक्षामध्ये बसून तिचा पाठलाग केला.

## विसर्जनासाठी स्वखर्चातून घेतला पुढाकार

। उरण । प्रतिनिधी ।

बाप्पाला निरोप देण्यासाठी नागांव तसेच परिसरातील भाविक पिरवाड समुद्रकिनारी विसर्जनासाठी येत असतात. मात्र, समुद्राच्या लाटांमुळे किनाऱ्यावर दगड जमा झाल्याने विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली होती.



ही बाब लक्षात घेऊन नागांव गावातील नागरिकांनी नागांव-म्हातवळी प्रकल्पग्रस्त वैभव कडू यांच्याकडे रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली. नागरिकांची अडचण लक्षात घेत वैभव कडू यांनी कोणाचीही वाट न पाहता स्वखर्चाने समुद्रकिनारी विसर्जनासाठी जाणारा मार्ग मोकळा करून दिला. गावकऱ्यांची अडचण ही आपलीच अडचण या भावनेतून केलेल्या या पुढाकारामुळे गणपती विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. बाप्पाच्या विसर्जनासाठी येणाऱ्या प्रत्येक भक्ताला सुरक्षित व सुलभ मार्ग उपलब्ध व्हावा, हाच या कामामागील उद्देश असल्याचे वैभव कडू यांनी सांगितले.

थ्रीडी अन् मेटल थीम मखरांना पसंती | विक्री अन् निर्मितीतून लाखो रुपयांची उलाढाल

# गणेशोत्सवात इको-फ्रेंडली मखरांचा थाट

। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत गणरायाची आरास, विविध मखर आणि सजावटीच्या साहित्याची मोठी आवक झाली आहे. विशेष म्हणजे थर्मोकोल आणि प्लास्टिकला फाटा देत नागरिकांचा कल आकर्षक पर्यावरणस्नेही मखरांकडे वाढल्याचे दिसून येत आहे. विविध थ्रीडी प्रकार आणि धातूचा आभास निर्माण करणाऱ्या थीममधील मखरांना मोठी मागणी असून, मखर विक्री आणि निर्मितीतून लाखो रुपयांची उलाढाल होत आहे.



प्लास्टिकमुक्तीच्या दिशेने पाऊल टाकत अनेक सजग व्यावसायिक, कलाकार आणि कारागिरांनी विघटनशील वस्तूंचा वापर करून हे मखर तयार केले आहेत. पुठ्ठा, सनबोर्ड, प्लायवूड, मखमली व जरीचे कापड, गादीचा फोम आणि कापडी फुलांचा वापर करून बनवलेले हे मखर टिकून राहणारे आणि खिशाला परवडणारे आहेत. हे मखर फोल्डेबल असल्याने ते सहजरीत्या कुठेही नेता येतात, तसेच त्यांचा पुनर्वापर करणे शक्य असल्याने नागरिक याला पहिली पसंती देत आहेत. गवतापासून बनवलेले मखर तसेच किल्ल्याच्या प्रवेशद्वाराची प्रतिकृती असलेले मखर देखील विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

थ्रीडी मखरांमध्ये रंग, पीओपी, प्लायवूड आणि एलईडी रोषणाईचा वापर करण्यात आला आहे. यात स्वामी समर्थ, विठ्ठल-रुक्मिणी कलाकृती आणि मोराच्या आकारातील मखरांना मोठी मागणी आहे. या मखरांच्या किमती १५०० रुपयांपासून सुरू होऊन अगदी १५ ते २० हजार रुपयांपर्यंत आहेत. कापडी मखर विविध आकारांत उपलब्ध असून, ते धुऊन पुन्हा वापरता येतात. त्यांची किंमत १००० रुपयांपासून पुढे आहे.

विशेष आकर्षण ठरणाऱ्या मेटल थीम मखरांबद्दल सांगताना कलाकार ओमकार कदम यांनी स्पष्ट केले की, पुठ्ठ्यापासून बनवलेले हे मखर पाण्यात सहज विरघळणारे आहेत. त्यावर गोल्डन, ब्राऊन-ब्लॅक रंग आणि लॅकर फिनिशिंग दिल्याने ते अगदी धातूसारखे दिसतात. त्रिशूल, शिवलिंग, त्रिमूर्ती, नदी, विठ्ठल आणि मंदिरांच्या विविध कलाकृतींमधील या मखरांना मागणी आहे.

# निवडक

## प्रलंबित विकासकामांसाठी बाळाराम पाटील यांनी घेतला पुढाकार

**पनवेल :** पालिका क्षेत्रातील प्रलंबित विकासकामे गती देऊन नागरिकांचे मूलभूत प्रश्न तातडीने सोडवण्यासाठी माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात पनवेल पालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्यासोबत बाळाराम पाटील, माजी नगरसेवक व विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीदरम्यान पडघे, रोहिंजण, धरणा कॅम्प आणि नावडे परिसरातील अंतर्गत रस्ते व गटाराच्या विकासकामांचा आढावा घेण्यात आला. तसेच, वळवली आणि टेंभोडे रिंग रोड तयार करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. नावडे झोपडपट्टी परिसरातील ब्रिजवळ काँक्रिटीकरण, झोपडपट्टी पुनर्वसन तसेच नागरिकांना आवश्यक असलेल्या पाणी, रस्ते, गटार आणि इतर मूलभूत सुविधांबाबतही प्रशासनाने गती द्यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली. या बैठकीला विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, देवेंद्र मढवी, राम पाटील, लतीफ शेख, योगिता फडके, मनीषा म्हात्रे, आर्या जाधव, नगरसेविका अर्चना भोईर, दिलीप कदम यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



## कोलाड सुतारवाडी मार्गाकडे वाहनांच्या लांबच लांब रांगा

**सुतारवाडी :** सोमवारी गणपतीचे आगमन होत असून हजारोच्या संख्येने कोकणवासीय आपल्या घराकडे निघाले असताना कोलाड सुतारवाडी मार्गाकडे १२ सप्टेंबर पासूनच लहान मोठ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. माणगावकडे जाणाऱ्या वाहनांना भिरा फाट्यावरून वळविण्यात आल्या, माणगाव बायपासचे काम अपूर्ण असल्यामुळे वाहनांच्या लांबचलांब रांगा टाळण्यासाठी प्रवाशांचे प्रवास सुखकर होण्यासाठी ज्यादा वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी कोलाड भिरा फाट्यावरून पहूर मार्गे, विळ्याकडून माणगावकडे तर पाली खोपोलीकडे जाणाऱ्या वाहनांना सुतारवाडी मार्गे वळविण्यात आली होती. यावेळी फाट्यावर मोठ्या प्रमाणावर लांबच लांब रांगा लागलेल्या होत्या कारण भिरा फाट्याजवळील रेल्वे जात असताना गेट पडला की दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणावर वाहनांच्या रांगा लागत होत्या. मात्र कोलाड भिरा पहुर या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पोलीस तैनात केल्यामुळे वाहना सुरळीतपणे रस्त्यावरून धावत होती. मात्र भिरा फाटा ते विळापर्यंत रस्त्यावर लहान मोठे खड्डे व खडी असल्यामुळे वाहनांना मार्ग काढताना कसरत करावी लागत होती.



## उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळवाटप

**माणगाव :** संपूर्ण मानवतेसाठी शांती, प्रेम आणि कल्याणाचा संदेश देणारे प्रेषित मुहम्मद हे सर्वांसाठी आहेत, या मानवतावादी विचाराला कृतीची जोड देत जामा मस्जिद व जमातुल मुस्लिमीन, टेमपाले तालुका माणगाव यांच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे रुग्णांना फळवाटपाचा हृदयस्पर्शी उपक्रम राबविण्यात आला. शनिवारी (दि. १२ ) सकाळी ११.३० वाजता हा उपक्रम पार पडला. जमातुल मुस्लिमीन टेमपाले गावचे अध्यक्ष अब्दुलअजीज गजगे यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील रुग्ण तसेच रुग्णालयीन कर्मचाऱ्यांना जवळपास १०० फळांच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले. रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या चेहऱ्यावर आजारपणाची चिंता असताना या छोट्याशा सेवाकार्यातून त्यांना मायेचा आणि आपुलकीचा स्पर्श मिळाला. धर्म, जात-पंथ यापलीकडे जाऊन माणूस म्हणून माणसाच्या दुःखात उभे राहणे हाच खरा मानवतेचा धर्म हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला. या वेळी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. मानसी मिरजकर, रुग्णालयीन कर्मचारी ऋतिक चोगले, क्लार्क विश्वनाथ तावरी, परिचारिका, वॉर्डबॉय तसेच जमातुल मुस्लिमीन टेमपालेचे उपाध्यक्ष अब्दुलअजीज अलसुलकर, मुफ्ती मुझफ्फर सेन, पोलीस पाटील समीर मुरुडकर, सुहेब अलसुलकर, साजिद खानदेशी, जहीर अलसुलकर, अजीज अलसुलकर, इनायत लोखंडे, अमान अलसुलकर, यासिन सेन, मोहम्मद गजगे, राहील दाखवे यांच्यासह मौलाना इरफान किरकिरे, हाफिज अहमद सेन, जहिर वाडेकर आदी उपस्थित होते.

## मोटारसायकल स्लिप झाल्याने एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** मोटरसायकल स्लिप झाल्याने १९ वर्षीय स्वराज सुभाष गायकवाड (राहणार मोराज रेसिडेन्सी तकका) याचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात ठाण्यात आली. ८ सप्टेंबर रोजी फिर्यादी आणि त्याचा मित्र पनवेल येथे नाश्ता करण्यासाठी जात होते. यावेळी ते कोळखे येथील महिंद्रा शोरूमच्या मेन गेट समोरील रस्त्यावर आले. स्वराज्यने मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ सीपी ०५२४ ही भरधाव वेगाने चालवली. आणि त्याची मोटरसायकल स्लिप झाली. या अपघातात त्याच्या पायाला, छातीला, हाताला गंभीर दुखापती झाल्या आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

## प्लास्टिकच्या फुलांनी फुलली बाजारपेठ



**पाताळगंगा :** बाप्पाच्या स्वागतासाठी खोपोली, कर्जत, मोहपाडा, चौक बाजारपेठ प्लास्टिकच्या फुलांनी सजली असल्यामुळे अनेक गणेशभक्तांचे लक्ष या फुलांकडे आकर्षित होत आहे. यामुळे ही फुले खरेदी करण्यात गणेशभक्त मग्न असलेले चित्र विविध ठिकाणी पाहावयास मिळत आहे. दरवर्षी गणरायाच्या आगमनाअगोदर बाजारपेठ फुलांनी बहरुन जात असते. आरास करण्यासाठी या फुलांचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असल्यामुळे प्लास्टीकची फुले विक्रीस ठेवली असल्यामुळे जणू बाजारपेठ रंगीबेरंगी फुलांनी बहरुन गेली आहे, असा भास अनेकांना पडत असतो. यामुळे या फुलांची अनेकांना भुरळ पडतच असते. गणेशभक्त अथवा पर्यटक काही क्षणभर थांबवून फुले खरेदी करीत असल्याचे दृश्य पाहावयास मिळत आहे.

# महाडात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

## ।। यंदा ५०० बाप्पांच्या कृत्रिम विसर्जनाचा निर्धार! ।। कृत्रिम विसर्जन तलाव उपक्रमाचे तिसरे वर्ष!

**। महाड । प्रतिनिधी ।**

पर्यावरणाचे संवर्धन करत यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याच्या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ महाड आणि महाड नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरणपूरक गणेशोत्सवांतर्गत कृत्रिम विसर्जन तलाव हा उपक्रम राबविण्यात येत आहे.



नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करून विसर्जनासाठी शहरातील उपलब्ध कृत्रिम विसर्जन तलावांचाच वापर करावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

गतवर्षी या उपक्रमांतर्गत जवळपास २०० गणेशमूर्तींचे कृत्रिम विसर्जन तलावात विसर्जन करण्यात आले होते. यंदा दीड, पाच, सात आणि दहाव्या दिवशी विसर्जनाच्या दिवशी ५०० च्या वर नेण्याचा निर्धार करण्यात आला आहे. याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत बोलताना रोटरी क्लबचे डॉ. चेतन सुर्वे यांनी दिली.

जलप्रदूषणाला आळा घालणे, नदी-नाले व जलस्रोतांचे संरक्षण करणे तसेच गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसात पोहोचविणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. गणेशभक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन बाप्पाला निरोप द्या, पण निसर्गाला नाही या संकल्पनेला बळ द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

या उपक्रमासाठी आणि सीस्केप, रंगसुगंध, अक्षरशिल्प, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट, महाड शहर विकास मंच, श्री राजेंद्र सामाजिक विकास संस्था, नाते, लायन्स क्लब, पुनरावर्तन पुणे, सेल्फ, कृषी महाविद्यालय महाड आणि स्वराज्य आदी अनेक संस्थांच्या सहकार्याचा उल्लेख करण्यात आला आहे.

या पत्रकार परिषदेला डॉ. चेतन सुर्वे, चिमणकर सर, स्नेहा बुटाला, नेहा मेहता, नगरकर, हेमंत जोशी, राजीव वनारसे आधी विवीध संस्थेचे पदाधिकारी आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'पीओपी'मूर्ती नदी-नाल्यांमध्ये विसर्जन टाळा**

नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्तींचा वापर, प्लास्टिकची सजावट व एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तू, नदी-नाले व जलस्रोतांमध्ये कचरा व निर्माल्य टाकणे तसेच ध्वनी व वायू प्रदूषण करणारे उपक्रम टाळावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. कृत्रिम विसर्जन तलावामध्ये श्री गणेश मूर्तींचे विसर्जन करणाऱ्या गणेशभक्तांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल, अशी माहितीही या उपक्रमाच्या प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आली आहे.

**कृत्रिम विसर्जन तलावांची ठिकाणे**

महाड शहरात गणेशमूर्ती विसर्जनासाठी रावसाहेब भिडे मैदान (काकरतळे), महाड नगर परिषद, महाड शाळा क्र. ५ मैदान आणि होडी बंदर (सावित्री घाटाजवळ) येथे कृत्रिम विसर्जन तलाव उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### पत्रकातील आवाहनावर प्रश्नचिन्ह

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात ध्वनी व वायू प्रदूषण टाळून फटाक्यांचा वापर टाळत शांततापूर्ण गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात सध्या याच विषयावरून विविध स्तरांवर चर्चा आणि वादंग सुरू असून, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच सेलिब्रिटींकडून याबाबत परस्परविरोधी भूमिका व्यक्त केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर पत्रकार परिषदेत एका ज्येष्ठ पत्रकाराने आयोजकांना पत्रकातील या आवाहनाबाबत त्यांची भूमिका नेमकी काय आहे, असा थेट सवाल केला. मात्र, या प्रश्नावर आयोजकांनी कोणतेही भाष्य करण्यास नकार देत भूमिका स्पष्ट करण्याचे टाळले. एका बाजूला प्रसिद्धीपत्रकातून ध्वनी व वायू प्रदूषण टाळण्याचे आवाहन करायचे आणि दुसऱ्या बाजूला त्याच मुद्द्यावर पत्रकार परिषदेत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळायचे, अशी काहीशी विसंगती यावेळी जाणवली. त्यामुळे पर्यावरणपूरक गणेशोत्सवाच्या या उपक्रमाबरोबरच आयोजकांची या संवेदनशील मुद्द्यावरील नेमकी भूमिका काय, याबाबत महाडमध्ये चर्चा रंगली.

### एक छोटी कृती.. मोठा बदल..!

ज्या मातीने बाप्पाला आकार दिला, त्याच निसर्गाचे रक्षण करणे हीच बाप्पाप्रती खरी भक्ती. चला, यंदा एक संकल्प करूया... बाप्पाला निरोप देऊया, पण सावित्री मातेला नाही!फ असा पर्यावरण संवर्धनाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे.

### शाडूमूर्तीला प्राधान्य

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नागरिकांनी शाडूमातीच्या गणेशमूर्तींची स्थापना करावी, नैसर्गिक व पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा तसेच कमी उंचीच्या व लहान आकाराच्या गणेशमूर्तींची निवड करावी, असे आवाहन महाडकर नागरिकांना करण्यात आले आहे. गणेशमूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावामध्ये करावे आणि निर्माल्य स्वतंत्रपणे संकलित करून निर्माल्य कलशात टाकावे, असेही यावेळी सांगण्यात आले आहे. प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशव्यांचा वापर करावा. सजावटीसाठी नैसर्गिक व पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंचा वापर करावा. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखून कचरा कचराकुंडीत टाकण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

---

# गणेशभक्तांना पूजेचे साहित्य वाटप




**। माथेरान । प्रतिनिधी ।**

मागील तेरा वर्षांपासून येथील गणेश भक्तांना गणेशोत्सव काळात मोफत पूजेचे साहित्य वाटप करण्याचा अविरतपणे प्रयत्न सुरू असून यासाठी प्रवीण सकपाळ आणि किरण चौधरी यांच्या पुढाकाराने पूजा साहित्य वाटप कार्यक्रम श्रीराम चौकात आयोजित करण्यात आला.

यावेळी उप नगराध्यक्ष संतोष शेलार, अरविंद शेलार, शैलेश चाफेरकर, मराठा समाज अध्यक्ष चंद्रकांत जाधव, संदीप शिंदे, राकेश कोकळे, विठ्ठल पवार यांसह अन्य नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.एकूण चोवीस पूजेच्या वस्तू भरलेला बॉक्स प्रत्येक घरगुती गणेशभक्तांना वाटप करण्यात आला. माथेरानमध्ये दीड दिवस, पाच दिवस, दहा दिवस आणि सार्वजनिक गणेश मंडळाच्या मिळून जवळपास १०५ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात येते.

---

# नेरळ ग्रामपंचायत विरोधातील उपोषण यशस्वी

## १३ वाड्यांना सार्वजनिक भांडी दिली जाणार

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ सारख्या मोठ्या लोकवस्तीच्या ग्रामपंचायतीमध्ये आदिवासी निधी खर्च केला नव्हता. त्यामुळे आदिवासी कार्यकर्ते सुनील पारधी यांनी उपोषण सुरू केले होते.या उपोषणाला वाढता पाठिंबा लक्षात घेऊन नेरळ ग्रामपंचायतीने आदिवासी वाड्यांसाठी सार्वजनिक वापराची भांडी देण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

नेरळ ग्रामपंचायतीमध्ये १३ आदिवासी वाड्या आहेत, त्या आदिवासी वाड्यांना सार्वजनिक वापरासाठी जेवण बनवण्याची भांडी दिली जाणार होती. त्यासाठी आर्थिक वर्षात ३६ लाख रुपये खर्च केले जाणार होते. मात्र ग्रामपंचायत प्रशासनाने सप्टेंबर महिना सुरू



झाला तरी भांडी वाटप केले नाही आणि भांडी खरेदी देखील केलेली नाहीत. त्यामुळे १३ वाड्यांना भांडी वाटप कराव्यात यावे आणि संबंधित आदिवासी निधी थांबवून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी सुनील पारधी यांनी उपोषणाचा इशारा दिला होता. ग्रामपंचायत कडून कार्यवाही होत नसल्याने ग्रामपंचायत माजी सदस्य सुनील पारधी यांनी नेरळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या समोर उपोषण सुरू केले होते.

> आमची आदिवासी लोकांची मागील सहा महिने फसवणूक सुरू आहे, मात्र ज्येष्ठ मंडळी यांना शब्द म्हणून उपोषण मागे घेतो. परंतु रविवार वाटप सुरू झाले नाही तर पाच दिवसांचे बाप्पांचे विसर्जन झाल्यांवर पुन्हा याच ठिकाणी उपोषण केले जाईल.
> – सुनील पारधी.उपोषणकर्ते

> आमच्या अडचणी पोर्टल काम करीत नसल्याने वाढल्या होत्या,मात्र आता पोर्टल व्यवस्थित काम करीत असून रविवारी आम्ही सुट्टी न घेता ग्रामपंचायतीमध्ये भांडी वाटप सुरू करू.
> – सुजित धनगर.. प्रशासक

---

# नेरळ गावातील खड्डे भरण्याची मोहीम सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतकडून मोठे खड्डे भरण्यात येत आहेत. गावात प्रामुख्याने मोहाची वाडी आणि नेरळ गणेश घाट येथील खड्डे भरण्याची कामे ग्रामपंचायतीकडून सुरू होते.

नेरळ येथील गणेश घाटावर गणेश विसर्जन सोहळ्याला हजारो भक्तांची गर्दी असते. त्या ठिकाणी कल्याण कर्जत रस्त्याच्या बाजूला मोठे खड्डे निर्माण झाले होते.त्यामुळे वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण झाली होती. ही बाब नेरळ पोलीस ठाण्याच्या शांतता



कमिटीच्या मिटिंगमध्ये उपस्थित झाल्यावर ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी गावातील गणेश घाट परिसरातील खड्डे भरले जातील असे जाहीर आश्वासन दिले होते. त्यानंतर जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे आणि पंचायत समिती सदस्य भगवान चंचे यांच्या उपस्थितीत भरण्यास सुरुवात झाली.त्यावेळी ग्रामपंचायत अधिकारी यांनी तेथे ग्रामपंचायत कर्मचारी यांची मदत घेऊन डंपरमधून आणलेली जेएसबी खडी मिश्रित दगड पसरवण्याचे काम केले.

ग्रामपंचायत जेएम पोर्टलवर परवानगी मिळेल त्यावेळी बिल अदा होईल अशी माहिती ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी दिली आहे. गणेश भक्तांची गैरसोय टाळण्यासाठी आपण आता खर्चाची जबाबदारी उचलली असून काही गाड्या खडी टाकण्यास सुरुवात केली आहे.

---

# नेरळ-कळंब रस्त्यावर धुळीचे लोट

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ फाटकपासून साईमंदिर भागात काँक्रिटीकरण करण्यासाठी रस्त्याचा पृष्ठभाग बनवला आहे.मात्र त्या ठिकाणी सिमेंटचे रस्त्यावरील धूळ उडत असून वाहनचालक आणि दुचाकीचालक त्रस्त झाले आहेत.

माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ रेल्वे फाटक पासून कळंब पोही या भागातील रस्ता काँक्रिटचा बनविला जात आहे. त्यासाठी नेरळ भागातील रेल्वे फाटकापासून निर्माण नगरी गेटपर्यंत खडीकरण करण्यात आले आहे. त्यानंतर महिना लोटला तरी रस्त्यावर काँक्रिटीकरण करण्यात आले नाही. त्यामुळे रस्त्यावर प्रचंड धूळ निर्माण झाली असून रस्त्यावरील धूळ वाहतूक विस्कळीत करणारी ठरत आहे.त्याचवेळी दुचाकी चालक यांना गाडी चालवताना नाका तोंडांत मातीमिश्रित धूळ जाऊन आजारी पडण्याची लक्षणे दिसत आहेत.तर रस्त्याचे काँक्रिटीकरण काम संबंधित बांधकाम खात्याने वेळेत केले असते तर ऐन गणेशोत्सव काळात वाहनचालक हे येथील धुळीमुळे त्रस्त झाले नसते.

या ठिकाणी ज्या भागातील रस्त्याचे काँक्रिटीकरण केले जाणार आहे,तेथून पर्यायी मार्ग उपलब्ध असल्याने एकावेळी संपूर्ण रस्ता काँक्रिटीकरण केला जाऊ शकतो. ठेकेदाराने मनावर घेतले तर आठ दिवसात या संपूर्ण रस्त्याचे काँक्रिटीकरण होऊ शकते.त्यामुळे वाहनचालक आणि स्थानिकांची गैरसोय करीत रस्त्याचे काँक्रिटीकरण करून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा अशी मागणी दुकानदार करीत आहेत.

---

# गणेशोत्सवासाठी तळा बाजारपेठ सजली

**। तळा । प्रतिनिधी ।**

लाडक्या बाप्पाच्या आगमनाला अवघे दोन दिवस शिल्लक राहिले असल्याने गणेशोत्सवासाठी लागणाऱ्या विविध साहित्यांनी तळा बाजारपेठ फुलून गेली आहे.

गणेशोत्सवासाठी मुंबईकडे स्थलांतरित झालेले चाकरमानी आपल्या गावी परतू लागले असून घराची साफसफाई करून बाप्पाच्या स्वागताची तयारी करत आहेत. तळा हे तालुक्याचे ठिकाण असल्याने आजूबाजूच्या ग्रामीण भागातील नागरिकही खरेदीसाठी तळा बाजारात येत आहेत.



सध्या बाजारात गणरायाच्या पूजेसाठी लागणारे धूप, कापूर, अगरबत्ती, कंठीहार, तसेच घराच्या व मखराच्या सजावटीसाठी लागणाऱ्या कृत्रिम फुलांच्या माळा, रंगीबेरंगी तोरणे, विद्युत रोषणाईच्या माळांनी दुकाने सजली आहेत.याशिवाय मोदक, फळे, पालेभाज्या व इतर जीवनावश्यक वस्तू माफक दरात मिळत असल्याने खरेदीसाठी नागरिकांनी केली आहे.

---

# मेटकर्णी परिसरात रस्त्यांची दुरवस्था

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

म्हसळे श्रीवर्धन मुख्य रस्त्यालगत मेटकर्णी गावातील काही घरे असून सर्वात दाट वस्ती डोंगरावरती आहे. डोंगरावरती जाण्यासाठी काँक्रीटचे रस्ते तयार केलेले होते. परंतु या रस्त्यांची प्रचंड प्रमाणात दुरावस्था झाली आहे. अनेक ठिकाणच्या मोऱ्या खचून गेल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरून वाहत आहे. तर रस्ते फुटून लोखंडी सळ्या रस्त्यावरती आलेल्या पाहायला मिळत आहेत. यामध्ये अनेक लहान मुले, वृद्ध व्यक्ती पडल्याचे देखील सांगितले जात आहे.

या ठिकाणी पाणीपुरवठा योजना करणाऱ्या ठेकेदाराने पाण्याचे पाईपदेखील रस्त्याच्या बाजूने उघड्यावर टाकल्याने रस्त्यातून चालताना अडचण निर्माण होते. सध्या या रस्त्यावरती पडलेले खड्डे व खचलेल्या मोऱ्या यावरील खड्डे बुजवण्याचे काम ग्रामपंचायतीकडून हाती घेण्यात आले आहे. पडलेल्या खड्ड्यांमध्ये व खचलेल्या रस्त्याच्या ठिकाणी काँक्रीट ओतून रिपेअर करण्याचे काम सुरू आहे. दोनच दिवसात गणरायाचे आगमन होणार असून गणेशमूर्ती डोक्यावरती आणण्यासाठी पायाखालील रस्ता तरी चांगला असावा अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

या परिसरामध्ये ग्रामपंचायतीकडून साफसफाई देखील करण्यात येत नसल्यामुळे सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले पाहायला मिळते. असेही संपूर्ण आराठी ग्रामपंचायत हद्दीमध्ये कचऱ्याचे साम्राज्य असल्याचे पाहायला मिळते. तसेच एका इमारतीतील सांडपाणी देखील मुख्य रस्त्यावरती वाहताना पाहायला मिळते.

---

# तळा स्थानकातील स्वच्छतागृह सुरू

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा बस स्थानकातील उद्घाटनानंतर दुसऱ्याच दिवसापासून कुलूपबंद असलेले शौचालय अखेर सुरू करण्यात आले असून याचा थेट लाभ विद्यार्थिनींसह महिला प्रवाशांना होणार आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले होते. दुसऱ्याच दिवसापासून पाण्याची सोय नसल्याचे कारण देत एसटी प्रशासनाने त्याला कुलूप लावले होते. त्यामुळे महिला प्रवासी व विद्यार्थिनींचे मोठे हाल होत होते.

---

## उरणकरांच्या उत्साहावर पडले पाणी | गणेशोत्सवाच्या तोंडावर नियोजनाचा बोजवारा

# गणरायाचे स्वागत खड्डे, कोंडी अन् अंधारात!

**। उरण । प्रतिनिधी ।**

गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात गणरायाच्या आगमनाची तयारी उरणमध्ये जोरात सुरू असतानाच शहरातील खड्डे, वाहतूक कोंडी आणि विजेच्या लपंडावाने प्रशासनाच्या नियोजनाचे तीनतेरा वाजले आहेत.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला असतानाही रस्त्यांची दुरवस्था कायम असल्याने गणेशभक्तांमध्ये संतापाची लाट आहे. बाप्पाला घरी आणायचे तरी खड्ड्यांच्या मार्गाने कसे? असा सवाल आता उरणकर विचारत आहेत.

गणेशोत्सव हा उरणकरांच्या श्रद्धेचा आणि उत्साहाचा मोठा सण. घराघरांत गणरायाच्या स्वागताची तयारी सुरू असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून मंडप, सजावट, रोषणाई आणि मिरवणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मात्र दुसरीकडे शहरातील रस्त्यांची अवस्था पाहिली तर उत्सवाच्या तयारीपेक्षा प्रशासनाच्या निष्क्रियतेचीच चर्चा अधिक रंगताना दिसत आहे.

शहरातील अनेक रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसामुळे हे खड्डे आणखी धोकादायक बनले असून वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. गणेशमूर्ती घेऊन येणारी वाहने, सजावटीचे साहित्य घेऊन जाणारी वाहने तसेच गणेशभक्तांच्या वाहनांची संख्या आगामी दिवसांत मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. अशा परिस्थितीत रस्त्यांची डागडुजी न झाल्यास अपघाताला आमंत्रण मिळण्याची भीती व्यक्त होत आहे.

गणेशोत्सव जवळ आला की रस्ते दुरुस्तीच्या हालचाली सुरू होतात. काही ठिकाणी वरवरची डागडुजी करून प्रशासन काम झाले असे दाखवते; मात्र पावसाची एक-दोन सर आली की डागडुजीची पोलखोल होते. यंदाही अशीच डागडुजी करून वेळ मारून नेण्याचा प्रकार झाला तर गणेशभक्तांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.दरम्यान, शहरातील अरुंद रस्ते आणि वाढत्या वाहन संख्येमुळे वाहतूक कोंडीची समस्या आधीपासूनच गंभीर आहे. त्यात रस्त्याच्या कडेला उभी राहणारी वाहने, बेशिस्त पार्किंग आणि वाहतुकीच्या नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे प्रमुख मार्गांवर नागरिकांना कोंडीचा सामना करावा लागत आहे.

### नियोजन फक्त बैठकीपुरतेच?

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून दरवर्षी विविध बैठका घेतल्या जातात. रस्ते, वाहतूक, वीज, स्वच्छता, पाणी, सुरक्षा आणि विसर्जन व्यवस्था याबाबत सूचना दिल्या जातात. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर ङ्गनियोजन झाले तरी कुठे? असा प्रश्न उरणकरांना पडला आहे.गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंत लाखो भाविक रस्त्यावर येणार आहेत. त्यामुळे रस्त्यांवरील खड्डे, वाहतूक कोंडी, बेशिस्त पार्किंग, अपुरे पथदिवे आणि वीजपुरवठ्याची समस्या वेळीच दूर करणे आवश्यक आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने धावपळ करण्यापेक्षा उत्सव सुरू होण्यापूर्वीच त्रुटी दूर करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे.

---

# निवडक

## २० वीज चोरांवर गुन्हा दाखल

**कल्याण :** महावितरणकडून वारंवार आवाहन करूनही चुकीच्या मार्गाने वीज वापरणाऱ्या मांडा, टिटवाळा परिसरातील २० वीज ग्राहकांच्या विरोधात महावितरणकडून रितसर मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. महावितरण कडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, मांडा, टिटवाळा परिसरात वीज चोरी होत असल्याची माहिती महावितरणच्या अभियंत्यांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी सहायक अभियंता तुकाराम घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तपासणी केली. तपासणी दरम्यान बहुतांश वीज ग्राहक चोरी करुन वीज वापर करीत असल्याचे आढळून आले. महावितरण कडून दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत पांडुरंग अंगम, प्रविण जाधव, अमीना बी अख्तर, आरती शर्मा, रेणू शुक्ला, मोहम्मद मलिक अजगर अली, राबिया अन्सारी, रोषन कलसुकर, सुमित्रा भगत, मोहम्मद अयुब, अल्फिया डेव्हलपर, ए.एस.बाबा इलेक्ट्रिकल, जगदीश धुमाळ, सुनील शिंदे, विनायक पाटील, सुनील खरात, जयश्री जाधव, किशोर राठोड, आकाश पाल या वीज ग्राहकांनी महावितरणची ८७८३ युनिटची वीज चोरून वापरली अशी फिर्याद महावितरण कडून देण्यात आली आहे. मुरबाड पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## वाजेकर ज्युनिअर कॉलेजमध्ये मेळावा



**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय, फुंडे येथे कला शाखेचा विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास चेअरमन कृष्णाजी कडू तसेच उपमुख्याध्यापिका संगीता थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर प्रा. किशोर पाटील यांनी प्रास्ताविकात ज्युनिअर कॉलेजच्या कला शाखेच्या निकालाची गौरवशाली परंपरा विशद केली. विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळाव्याचा उद्देश स्पष्ट करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये शिक्षक व पालक यांच्या समन्वयाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कला शाखेच्या निकालाचे वाचन केले. प्रा. बाबुलाल पाटोळे यांनी विद्यार्थी व पालकांच्या जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालकांनी घरातून योग्य वातावरण निर्माण करावे, तसेच विद्यार्थ्यांनी आपली कर्तव्ये जबाबदारीने पार पाडावीत, असे त्यांनी सांगितले. चेअरमन कृष्णाजी कडू यांनी विद्यालयाच्या वर्षानुवर्षांच्या प्रगतीचा आढावा घेतला. पालकांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांची कर्तव्ये याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, प्रा. परशुराम कदम, प्रा. प्रमोद म्हात्रे, प्रा. सविता म्हात्रे यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणित अध्यापक मंडळातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव



**खरोशी :** महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे गणित संबोध प्राविण्य प्रज्ञा व पारंगत परीक्षा यांचा गुणगौरव सोहळा पेण शिक्षण महिला समितीचे सुमतीबाई देव माध्यमिक विद्यालय पेण येथे संपन्न झाले.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चांगा काना ठाकूर विद्यालयाचे प्राचार्य चव्हाण, पेण शिक्षण महिला समितीच्या अध्यक्षा सुहासिनी देव, माजी मुख्याध्यापिका काशिकर, मंडळाचे अध्यक्ष दिलीप मोरे, माजी शिक्षक घोडके, माजी परीक्षा समिती प्रमुख शिरकांडे, उदय म्हात्रे, शर्वरी जोशी आदी शिक्षक उपस्थित होते. अनेक मान्यवर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रायगड गणित अध्यापक मंडळाचे परीक्षा समिती प्रमुख संतोष जाधव यांनी केले. इयत्ता आठवीतील गोल्ड मेडल विजेते श्रेयस साने, अर्जुन सौदागर व आदित्य कोळी या तीन प्रज्ञावान विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय स्कॉलरशिप प्राप्त केली आणि रायगड जिल्ह्याचे नाव राज्यात लौकिक केले. सिल्वर मेडल २३ विद्यार्थी अशा प्रज्ञा परीक्षेत महाराष्ट्र राज्यात चमकले त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले. पालक व विद्यार्थी यांनी मनोगत व्यक्त केले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **Vacancy in furniture Workshop** office Education - Graduation Experience - 2 years Location - Bamansure, chondhi Contact - 9823585321
- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे** ठिकाण-झिराड, पात्रता -MBA अनुभव -३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना Contact- 9823585321
- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबागमध्ये** ऑफिस कामासाठी स्थानिक मुलगी पाहिजे व ड्रायव्हर पाहिजे. 9763006555
- **अलिबाग एसटी स्टॅन्डजवळ** दुकान गाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९.
- **जन्नावार हॉस्पीटल चेंढरे** अलिबाग मध्ये कामासाठी मावशी स्टाफ नर्स साठी जागा आहे. संपर्क - ७७९८० ३४५०९
- **प्रल्हाद इलेक्ट्रीकल्स** - घरगुती इलेक्ट्रीक वस्तु घरी येऊन किंवा घरून घेऊन जाऊन चेक अथवा दुरूस्त केल्या जातील. ७०६६१३८३६८/७३७८४८०१५१
- **TANNA FINSERV** शॉप नं. १, शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियन वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड, ऑफिस स्टाफची आवश्यकता, शेअर मार्केटसाठी Bolt Operator आवश्यक, Tanna Finserv मध्ये करिअरची उत्तम संधी! संपर्क: ९९२३७५०५४९/९१०५७१७०३८. इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा. अनुभवी व नवोदित उमेदवारांचे स्वागत आहे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# स्वस्त धान्यासाठी ई-केवायसीची सक्ती

**| रायगड | प्रतिनिधी |**

**पुरवठा विभागाने शिधापत्रिकेसाठी ई-केवायसी आता सक्तीची केली आहे. शिधापत्रिकेत नाव असलेल्या प्रत्येक सदस्यांना ई-केवायसी करावी लागेल. त्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली. या मुदतीत शिधापत्रिकेची ई-केवायसी न केल्यास स्वस्त धान्य बंद केले जाणार असल्याचे पुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.**



सर्व पात्र शिधाधारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अत्यंत बंधनकारक केले आहे. आगामी ३० सप्टेंबरपर्यंत शिधापत्रिकामधील सर्व सदस्यांनी ई-केवायसी पूर्ण न केल्यास, संबंधित लाभार्थ्यांना धान्य मिळणे कायमचे बंद होणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या पारदर्शक धोरणानुसार, स्वस्त धान्याचा लाभ केवळ प्रत्यक्ष गरजू व पात्र नागरिकांपर्यंतच पोहोचावा, तसेच वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी ई-केवायसी सक्तीचे करण्यात आले आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी

**■ ग्राहकांनो थेट धान्यच बंद होणार**

**■ ३० सप्टेंबरपर्यंतची अंतिम मुदत**

सांगितले. ई-केवायसी करण्यासाठी नागरिकांनी आपल्या गावातील किंवा परिसरातील जवळच्या अधिकृत स्वस्त धान्य दुकानाला प्रत्यक्ष भेट द्यावी लागेल. ई-पॉस मशीनवर आपल्या बोटांचे ठसे अद्ययावत करून ही प्रक्रिया विनामूल्य पूर्ण केली जाणार आहे. शिधापत्रिकेमधील सदस्याची ई-केवायसी होणे अनिवार्य केले. ई-केवायसी न करणाऱ्या लाभार्थ्यांना धान्याची गरज नाही, असे गृहीत धरून त्यांचे धान्य थांबवले जाईल. मुदतीपूर्वी ई-केवायसी पूर्ण करून स्वस्त धान्य मिळण्याचा मार्ग सुरक्षित करणे गरजेचे असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले.

### साखरसाठ्याची मर्यादा आता २ हजार क्विंटलवर

जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत १ ऑगस्टपासून साखरेची साठा मर्यादा लागू झाली. आता साखरसाठ्याची मर्यादा चार हजारहून दोन हजार क्विंटलवर कमी करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित व्यावसायिकांना दोन हजार क्विंटलपर्यंतच साठवणूक करता येईल. जिल्हा पुरवठा विभागाने जिल्ह्यात तपासणी पथके गठित केली आहेत. त्याद्वारे वेळोवेळी भेटी, पडताळणी, तपासणी केली जात आहे. सर्व साखर व्यावसायिकांनी अन्नसाठा देखरेख पोर्टलवर तत्काळ नोंदणी करणे गरजेचे आहे. प्रत्येक शुक्रवारी साखर साठा अद्ययावत करून पोर्टलवर चुकीची,अपूर्ण, विलंबित माहिती देणे गंभीर मानून कारवाई केली जाईल, असा इशाराही पुरवठा विभागाने दिला.

## सुरेश ठोंबरे यांचे निधन

**पाली :** सुधागड पंचायत समितीचे माजी सभापती तथा पाली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सुरेश ठोंबरे यांचे शुक्रवारी (दि.११) निधन झाले. मृत्युसमयी ते ७३ वर्षांचे होते. त्यांच्या अंत्यविधीसाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रांतील अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना अखेरचा निरोप दिला. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, सुना, नातवंडे आणि पतवंडे असा मोठा परिवार आहे.



त्यांचा दशक्रिया विधी २० सप्टेंबर रोजी उद्धर येथे होणार असून, उत्तरकार्य २३ सप्टेंबर रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार आहेत.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# दुचाकी अपघातात महिला जखमी

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

साळाव -मुरुड रस्त्यावर काशिद येथे पूला जवळ झालेल्या स्कुटी अपघातात एका महिलेला आपला पाय गमवावा लागला असल्याचे समोर आले आहे.



गणपती बाप्पांचे आगमन अवघ्या तीन दिवसांवर आले असता राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटीकरणात काशिद रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या खोदाईने बाप्पाचा प्रवास खडतर होणार असून वाहनचालक प्रवासी, ग्रामस्थ भक्तगणांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. प्रशासन व संबंधित अधिकारी वर्गाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली जात असल्याचे वृत्त दोन दिवसांपूर्वीच देण्यात आले होते.

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला असल्याने मुंबई, पुणे अन्य ठिकाणाहून कोकणात चाकरमानी मोठ्या प्रमाणावर आपल्या गावी येतात. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटीकरणात काशिद रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या खोद कामामुळे या रस्त्यावरील बाप्पांचा प्रवास खडतर होण्याची भीती व्यक्त केली जात असून वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे वृत्तात म्हटले होते.

राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळ संबंधित अधिकारी व प्रशासन तसेच आपत्ती व्यवस्थापनाने याची गणेश चतुर्थीच्या दोन दिवस आधीच दखल घेऊन योग्य ती काळजी घ्यावी, अशी मागणी वाहनचालक प्रवासी ग्रामस्थ व गणेश भक्तांकडून केली जात होती. अखेर शनिवारी ( दि.१२) सायंकाळी झालेल्या स्कुटी अपघातात एका महिलेला आपला पाय गमवावा लागला असल्याचे समोर आले. याबाबत आमच्या प्रतिनिधीने संबंधित पोलीस अधिकारी व पोलीस पाटील यांच्याशी संपर्क साधला असता अधिक माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

## कोकणवासियांसाठी मोफत चहा-नाश्ता

**नागोठणे :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या कोकण वासियांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोहा तालुक्याच्या वतीने मोफत चहा, नाश्ता व पाण्याची व्यवस्था करण्यात आली. रोहा तालुका मनसे कडून राबविण्यात येणाऱ्या या सामाजिक उपक्रमाचे हे सलग तिसरे वर्ष आहे. मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणेजवळील चिकणी गावाच्या हद्दीत महाडकडे जाणाऱ्या मार्गिकेलगत मंडप उभारून मोफत चहा नाश्त्याची सेवा सुरू ठेवण्यात आली होती. कोकणात जाणाऱ्या हजारो प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेतला. वाहतूक कोंडी आणि लांबच्या प्रवासामुळे थकलेल्या गणेशभक्तांना प्रवासादरम्यान विसावा मिळावा, ऊर्जा मिळावी आणि त्यांचा प्रवास सुखकर व्हावा, हा यामागचा मुख्य हेतू आहे.

## भजनी मंडळांना साहित्याचे वितरण



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्राम पंचायत मधील नोंदणीकृत अशा ११ भजनी मंडळांना भजनाचे साहित्याचे वाटप करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषदेने ग्रामपंचायत स्तरावर नोंदणीकृत असलेल्या भजनी मंडळांना गणेशोत्सवाच्या धर्तीवर भजनाचे साहित्य देण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हाभर हे साहित्य वाटप सुरू असून नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील भजनी मंडळांचा साहित्य देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे, पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे,सुजित धनगर, अरुण कार्ले यांच्यासह नागो गवळी, शहर प्रमुख बंडू क्षीरसागर, चिंधू बाबरे, प्राची मनवे, कल्पना चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी नेरळ गावातील श्रीराम प्रासादिक भजन मंडळ, श्री साईबाबा प्रासादिक भजन मंडळ,गणेश प्रासादिक भजन मंडळ,श्री विठ्ठल रखुमाई प्रासादिक भजन मंडळ, श्रीकृष्ण प्रासादिक भजन मंडळ,श्री दत्तगुरू प्रासादिक भजन मंडळ, श्रीरामकृष्ण हरी प्रासादिक भजन मंडळ, श्री नेरळ परिवार वारकरी संप्रदाय भजन मंडळ, स्वरांजली संगीत भजन मंडळ, श्री दुर्गादेवी भजन मंडळ आदी ११ मंडळांना साहित्याचे वाटप केले.



## विद्यार्थ्यांनी साकारला बाप्पा!

**| पनवेल | वार्ताहर |**

डेरवली शाळेत आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू माती व लाल मातीपासून गणपतीच्या मूर्ती तयार करण्याचा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला आणि कौशल्याला वाव देत मातीला आकार देऊन सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. स्वतःच्या हातांनी बाप्पाची मूर्ती घडविताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह ओसंडून वाहत होता.मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कृती कौशल्याला चालना मिळण्यासोबतच नवनिर्मितीची क्षमता विकसित झाली. तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्वही विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजले.

नवनिर्मितीतून आनंद आणि पर्यावरणातून संवर्धन असा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला. गणेशोत्सवात पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर करण्याची गरजही विद्यार्थ्यांना यानिमित्ताने समजावून सांगण्यात आली.

# गणेशभक्तांना फुलांसाठी खिसा करावा लागणार खाली

**| खांदा | वार्ताहर |**

श्री गणेशोत्सवाला सुरुवात होणार असल्याने गणेशभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.लाडक्या बाप्पाच्या आगमनाचे स्वागत करण्यासाठी घराघरांत सजावटीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. गणपतीच्या सजावटीसाठी लागणाऱ्या फुलांच्या खरेदीसाठी पनवेलच्या जुन्या भाजी मार्केटमध्ये रविवारी मोठी गर्दी झाली होती.विशेषतः महिला वर्ग मोठ्या संख्येने फुलांची आणि विविध प्रकारच्या हारांची खरेदी करताना दिसून आला. बाप्पाच्या स्वागतासाठी गुलाबाच्या पाकळ्या, झेंडू, शेवंती तसेच विविध आकर्षक फुलांचे हार बाजारात दाखल झाले आहेत. मात्र, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर फुलांची मागणी वाढल्याने हारांच्या



किमतीतही वाढ झाली आहे.

गुलाबाच्या पाकळ्या २०० ते ३०० रुपये किलो, तर गुलाबाचा साधा हार ५० ते १०० रुपये दराने विकला जात आहे. झेंडूचा हार ४० ते ८० रुपये, तर मोठ्या आकाराचा झेंडू हार १०० ते १५० रुपये दराने उपलब्ध आहे.शेवंतीचा हार ८० ते १५० रुपये, तर मिश्र फुलांचा आकर्षक हार १५० ते २५० रुपये दराने विक्री होत आहे.बाप्पाच्या सजावटीसाठी विशेष पसंती असलेल्या ऑर्किडच्या हाराची किंमत २५० ते ५०० रुपये आहे. तर गुलाब आणि ऑर्किड मिश्रित आकर्षक हारासाठी ३०० ते ६०० रुपये मोजावे लागत आहेत. लहान गणेशमूर्तीसाठी तयार केलेले छोटे हार ३० ते ५० रुपये दराने उपलब्ध आहेत.मोठ्या गणेशमूर्तीसाठी विशेष तयार केलेल्या हारांची किंमत मात्र ५०० रुपयांपासून पुढे आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणावर फुलांची मागणी राहणार असल्याने दर आणखी वाढण्याची शक्यता विक्रेत्यांनी व्यक्त केली.पावसामुळे काही भागातून फुलांची आवक प्रभावित झाल्याने त्याचा परिणाम बाजारातील दरांवर झाला आहे.त्यातच गणेशोत्सवासाठी फुलांची मागणी अचानक वाढल्याने ग्राहकांना वाढीव दराचा सामना करावा लागत आहे.बाप्पाच्या स्वागतासाठी घराची सजावट, देवघर आणि गणेशमूर्तीच्या मंडपासाठी नागरिक फुले खरेदी करत आहेत. काही ग्राहकांनी साध्या हारांना पसंती दिली आहे.

गणपतीसाठी फुले आणि हार आवश्यक असल्याने दर वाढले असले तरी बाप्पाच्या स्वागतासाठी खर्च करावाच लागणार, अशी भावना गणेशभक्तांनी व्यक्त केली.

# गणेशोत्सवाच्या तोंडावर भाज्यांचे दर कडाडले

**| खांदा | वार्ताहर |**

गणेशोत्सवाला अवघे काही तास शिल्लक असताना पनवेल परिसरात शनिवारी रात्रीपासून जोरदार पावसाला सुरुवात झाली.रविवारी सकाळपासूनही पावसाचा जोर कायम असल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.



गणेशोत्सवासाठी घरातील स्वयंपाकाची तयारी करण्यासाठी नागरिकांनी पावसाची पर्वा न करता कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गर्दी केली.भाजीपाला खरेदीसाठी महिला वर्गासह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने बाजारात दाखल झाले होते.

मुसळधार पावसात छत्र्या आणि रेनकोटचा आधार घेत नागरिक भाजीपाला खरेदी करताना दिसून आले. कोकण पट्ट्यात पावसाचा जोर असला तरी घाटमाथ्यावरील काही भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्याने भाजीपाल्याची आवक घटली आहे.त्यामुळे मागणीच्या तुलनेत आवक कमी आणि त्यात गणेशोत्सवाची वाढलेली मागणी यामुळे दरवाढीचा परिणाम बाजारात दिसून आला.

बाजारात कोथिंबीर जुडी ३० ते ४० रुपये, मेथी २५ ते ३० रुपये, पालक २० ते ३० रुपये, शेपू २५ ते ३० रुपये दराने विकला जात होता.भेंडी ६० ते ८० रुपये, गवार ८० ते १०० रुपये, हिरवी मिरची ८० ते १०० रुपये, फ्लॉवर ६० ते ८० रुपये किलो दराने उपलब्ध होता.

वाटाणा १२० ते १४० रुपये, फरसबी ८० ते १०० रुपये आणि टोमॅटो ५० ते ६० रुपये किलोपर्यंत पोहोचला आहे.बटाटा ३० ते ४० रुपये, कांदा ३० ते ४० रुपये आणि वांगी ५० ते ६० रुपये किलो दराने विक्री होत होती.

## शिवसेना आरती संग्रह पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल :** देवद येथे शिवसेना पक्षाच्या वतीने जयंत पाखरे तसेच कामोठे येथील युवा नेते सुनील गोवारी यांच्या माध्यमातून बनविण्यात आलेल्या शिवसेना आरती संग्रह या पुस्तकाचे प्रकाशन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमाला शिवसेना उपनेते बबन पाटील, प्रसाद भोईर, अनिल चव्हाण, दीपक निकम, रामदास पाटील, भरत पाटील, समाधान काशीद, लीना गरड, शिरीष बुटाला, प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, यतीन देशमुख, बालेश भोजने, कैलास पाटील, रामदास गोवारी, विश्वास पेटकर, आर्या जाधव, ज्योती मोहिते आदी उपस्थित होते.

## शिक्षकांना आरोग्य कार्डचे वाटप

**पनवेल :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून कळंबोलीतील सुधागड शाळेच्या जुन्या इमारतीत गुरू सन्मान आरोग्य कार्ड वाटप सोहळा उत्साहात पार पडला.

या उपक्रमांतर्गत शिक्षकांना आरोग्य कार्डचे वाटप करण्यात आले. तसेच सुप्रसिद्ध तज्ज्ञ डॉक्टरांच्या माध्यमातून शिक्षकांसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन आणि प्राथमिक निदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

शिक्षकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासोबतच त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. विद्यार्थ्यांना ज्ञान, संस्कार आणि जीवनमूल्यांची शिकवण देणाऱ्या गुरूजनांचा सन्मान करण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हीदेखील समाजाची जबाबदारी आहे.

याच भावनेतून शिक्षकांसाठी आरोग्य कार्ड वाटप आणि मोफत आरोग्य मार्गदर्शनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला शिक्षक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# मुरुडमध्ये ७० लाखांचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद!

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुड शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी लाखो रुपये खर्च करून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अवस्था सध्या चिंताजनक बनली आहे. शहरातील जवळपास सर्वच सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तब्बल ७० लाख रुपये खर्च करून बसविण्यात आलेल्या या सुरक्षा यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील सुरक्षेची जबाबदारी असलेली यंत्रणा बंद पडल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



मुरुड शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांच्या सुरक्षेसाठी तसेच चोरी, घरफोडी, मारामारी, अपघात आणि इतर अनुचित घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी सुमारे ७० लाख रुपये खर्च करून तब्बल ७० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले. मात्र, आज या कॅमेऱ्यांपैकी जवळपास सर्वच कॅमेरे बंद असल्याची माहिती समोर येत आहे.

**■ सुरक्षेचा बोजवारा**

**■ गुन्हेगारीवर नजर ठेवणार कोण? नागरिकांचा संतप्त सवाल**

लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेली ही यंत्रणा प्रत्यक्षात नागरिकांच्या किती उपयोगी पडत आहे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. कॅमेरे बंद असल्यामुळे शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांवरील हालचालींचे निरीक्षण कसे केले जाते? एखादी चोरी, भांडण किंवा गंभीर घटना घडल्यास त्याचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध होणार का? असे अनेक प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.


### बैठकीतही सीसीटीव्हीचा मुद्दा

मुरुड शहरातील कायदा व सुव्यवस्था तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत माननीय पोलीस निरीक्षक यांच्याकडून सुद्धा सीसीटीवी कॅमेरा बाबत चर्चा करण्यात आली व निदर्शनास आले की बहुतेक सीसीटीव्ही कॅमेरे हे बंद अवस्थेत आहेत.या संदर्भात मुरुडच्या नगराध्यक्षा यांच्याशी प्रतिनिधीने संपर्क केला असता त्यांनी यासंदर्भात लक्ष देण्याचे आश्वासन दिले आहे.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.

मोबाईल : ९८६०६५८५६५

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into negotiations with Mr. Chandrakant Janu Shirishkar and Smt. Srushti Chandrakant Shirishkar ("Owner") who are sole owners of the property in the proportion as mentioned in the table hereinbelow, which is more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and is proposing to purchase/acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons/entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and/or demand and/or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owner in/ to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attorney, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlement or under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owner or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 7 (seven) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the Property)**

| Sr. No. | Particulars | Owner |
|---|---|---|
| 1. | All that piece and parcel of an agricultural land bearing Gat Kramank / Upavibhag 12/1 admeasuring about 0.23.10 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing to Rs.1.97 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag. District Raigad | Smt. Srushti Chandrakant Shirishkar |
| 2. | All that piece and parcel of an agricultural land admeasuring 0.16.00 Akak H.R.Sq.Mtrs., Assessing at Rs. 1.44 Ps. from and out of total land bearing Gat Kramank / Upavibhag 12/2 admeasuring about 1.87.00 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab/Fallow Land admeasuring 0.00.80 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessing to Rs. 16.78 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad | Mr.Chandrakant Janu Shirishkar |
| 3. | All that piece and parcel parcel of of an agricultural land bearing Gat Kramank / Upavibhag 5/2 admeasuring about 0.15.50 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing to Rs.2.00 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad | Mr.Chandrakant Janu Shirishkar |
| 4 | All that piece and parcel of the non-agricultural land bearing Gat Kramank / Upavibhag 5/3/4 admeasuring about 3.85.00 Akak R. Sq. Mtrs., Assessing to Rs. 38.50 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad. | Mr.Chandrakant Janu Shirishkar |
| 5. | All that piece and parcel of the non agricultural land bearing Gat Kramank/ Upavibhag 5/3/7 admeasuring about 4.19.00 Akak R. Sq. Mtrs., Assessing to Rs. 41.90 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad. | Mr.Chandrakant Janu Shirishkar and Smt. Srushti Chandrakant Shirishkar |
| 6. | All that piece and parcel of the non agricultural land admeasuring 1.37.00, Assessing at Rs. 13.70 from and out of land bearing Gat Kramank / Upavibhag 5/3/8 admeasuring about 10.40.00 Akak R. Sq.Mtrs., Assessing to Rs. 104.00 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad. | Mr.Chandrakant Janu Shirishkar |
| 7. | All that piece and parcel of the non agricultural land admeasuring 6.80.00, Assessing at Rs. 68.00 from and out of land bearing Gat Kramank /Upavibhag 5/3/8 admeasuring about 10.40.00 Akak R.Sq. Mtrs., Assessing to Rs.104.00 Ps., being, lying and situate at Village Chondhi, Taluka Alibag, District Raigad. | Smt. Srushti Chandrakant Shirishkar |

**Adv. S. Y. Bartake**
**Adv. S. S. Bartake**
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402201.

# ऐन गणेशोत्सवात उरणकरांची कोंडी



### तात्पुरत्या मार्गाची गरज

गणेशोत्सव हा सण आनंदाचा असतो; वाहतूक कोंडीच्या ससेहोलपटीचा नाही. त्यामुळे बायपासचा प्रश्न वर्षानुवर्षे रखडवून ठेवण्याऐवजी निदान गणेशोत्सवापुरता तरी तात्पुरता पर्याय उपलब्ध करून देण्याची वेळ आली आहे. गणेशोत्सवाच्या गर्दीत उरण शहर वाहतूक कोंडीत ठप्प होण्यापूर्वी प्रशासनाने उपलब्ध पर्यायी मार्गाचा तात्पुरता वापर करण्याचा निर्णय घ्यावा. बायपासचा कायमस्वरूपी प्रश्न नंतर सोडवता येईल; मात्र, सध्या नागरिकांना कोंडीत अडकवून ठेवण्यापेक्षा सुरक्षित तात्पुरता मार्ग उपलब्ध करून देणे गरजेचे आहे,'' अशी भूमिका घन:श्याम कडू यांनी मांडली आहे. त्यामुळे आता प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

## बायपास अनेक वर्षे धूळ खात

## प्रशासन कागदी नियोजनात अडकून

**। उरण । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाच्या उत्साहाला यंदा वाहतूक कोंडीचे विघ्न लागले आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला गणेशमूर्ती, सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत वाढलेली गर्दी आणि गणेशोत्सवानिमित्त घराकडे निघालेल्या भाविकांची वाढलेली वर्दळ यामुळे उरण शहरातील रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागण्यास सुरुवात झाली. त्यातच उरण बायपास अनेक वर्षांपासून धूळ खात पडला आहे. त्यामुळे उपलब्ध पर्यायी मार्गाचा उपयोग करून घेण्याची संधी असतानाही प्रशासन केवळ कागदी नियोजनात अडकून राहणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

उरणमध्ये गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला गणेशमूर्ती, सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत प्रचंड गर्दी वाढली होती. तसेच, गणेशोत्सवानिमित्त घराकडे निघालेल्या भाविकांची वाढलेली वर्दळ यामुळे उरण शहरातील रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागण्यास सुरुवात झाली. गणेशोत्सव काळात या गर्दीत आणखी भर पडणार असल्याने उरणकरांच्या संयमाची परीक्षा घेणारी वाहतूक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. एकीकडे नागरिक कोंडीत अक्षरशः अडकून पडत असताना दुसरीकडे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेला उरण बायपास धूळ खात पडला आहे. उपलब्ध पर्यायी मार्गाचा उपयोग करून घेण्याची संधी असतानाही प्रशासन केवळ कागदी नियोजनात अडकून राहणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. उरण-कोटनाका पेट्रोल पंप परिसरातून सुरू होणारा बायपास बोरी नाका परिसरात जोडला जाणार आहे. कोटनाका येथून उड्डाणपुलाचे काम मोठ्या प्रमाणात पूर्ण झाले असून, बोरी येथील साईमंदिराच्या बाजूला वाहनांना खाली उतरता येण्याजोगी व्यवस्था तयार झालेली आहे. मात्र, पुढील काही अंतरातील काम आणि नगरपारीषद हद्दीतील जमीनविषयक वादामुळे हा मार्ग अद्याप पूर्णपणे वाहतुकीसाठी खुला झालेला नाही. मात्र, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर या उड्डाणपुलाच्या मध्यभागी असलेल्या गॅपवर आवश्यक तांत्रिक तपासणी करून तात्पुरते पॅचवर्क केले, तर गणेशोत्सवापुरता दुचाकी आणि छोट्या चारचाकी वाहनांसाठी हा मार्ग खुला करता येणे शक्य आहे. त्यामुळे प्रशासनाने याचा तातडीने विचार करणे गरजेचे आहे.

दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात वाहतूक कोंडीचा प्रश्न ऐरणीवर येतो. नियोजनाच्या बैठका होतात, वाहतूक व्यवस्थेचे आराखडे तयार होतात; मात्र, प्रत्यक्ष रस्त्यावर उतरल्यावर परिस्थिती जैसे थेच राहते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या काही दिवसांसाठी हा मार्ग सुरक्षिततेच्या सर्व आवश्यक उपाययोजनांसह खुला करता येतो का, याची तातडीने पाहणी करून निर्णय घेण्याची मागणी उरणचे सामाजिक कार्यकर्ते घन:श्याम कडू यांनी केली आहे.

# पत्री-फुलांनी पनवेलची बाजारपेठ फुलली



**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात होत असल्याने गणेशोत्सवाच्या पुर्वसंध्येला गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. त्यामुळे गणेश चतुर्थीच्या पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी पनवेलच्या भाजी मार्केटमध्ये रविवारी (दि.१३) मोठी गर्दी झाली होती. यावेळी भरपावसातही नागरिक छत्र्या घेऊन बाजारपेठेत खरेदीसाठी दाखल झाले होते. बाजारात गणपतीच्या पूजेसाठी आवश्यक असलेली विविध प्रकारची पत्री, पाने, फुले, फळे आणि पूजेचे साहित्य विक्रीसाठी आले होते. त्यात दुर्वा, बेलपत्र, आघाडा, केवडा, तुळस, शमी यांसह विविध प्रकारची पत्री विक्रीसाठी उपलब्ध होती. तसेच नारळ, केळी, मोसंबी, लिंबू यांसह विविध फळांचीही खरेदी केली जात होती.

# ''बाप्पा येणार... मग मोदक तर हवाच!''




## रंगीबेरंगी मोदकांनी पनवेल सज्ज

**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

लाडक्या गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच पनवेलमध्ये गणेशोत्सवाच्या खरेदीला वेग आला आहे. बाप्पाचा आवडता नैवेद्य असलेल्या मोदकांनी बाजारपेठाही सजल्या असून, विविध प्रकारच्या रंगीबेरंगी मोदकांकडे गणेशभक्तांचे लक्ष वेधले जात आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये सकाळपासूनच मोदक खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत आहे. पारंपरिक उकडीच्या मोदकांसह मावा, काजू, चॉकलेट, ड्रायफ्रूट, केशर, गुलकंद आणि विविध फ्लेवर्सच्या मोदकांना मागणी वाढली आहे. बाप्पाच्या नैवेद्यासाठी घरगुती पद्धतीने तयार केलेल्या मोदकांबरोबरच आकर्षक पॅकिंगमधील तयार मोदकही बाजारात उपलब्ध आहेत. रंगीबेरंगी आणि विविध आकारांच्या मोदकांनी मिठाईची दुकाने सजली असून, ग्राहकांकडून आवडीने त्यांची खरेदी केली जात आहे. यंदा विविध प्रकारच्या मोदकांच्या किमतीतही वाढ झाल्याचे ग्राहकांकडून सांगण्यात येत आहे. साध्या मोदकांपासून प्रीमियम ड्रायफ्रूट आणि चॉकलेट मोदकांपर्यंत किलोमागे दर वेगवेगळे आहेत. त्यामुळे कुटुंबातील प्रत्येकाच्या आवडीचा मोदक घेण्यासाठी नागरिक दुकानांमध्ये गर्दी करत आहेत. काही ग्राहकांकडून किलोच्या प्रमाणात मोदकांची खरेदी केली जात आहे, तर काही जण विविध प्रकारचे मोदक असलेले मिश्र पॅक पसंत करत आहेत.

बाप्पाला आवडणारा नैवेद्य म्हणून मोदकाला गणेशोत्सवात विशेष महत्त्व असल्याने यंदाही मोदकांच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. दरम्यान, ''बाप्पा येणार... मग मोदक तर हवाच!'' या भावनेतून गणेशभक्तांची मोदक खरेदी सुरू असून, पनवेलच्या बाजारपेठेत गणेशोत्सवाचा गोडवा दरवळू लागला आहे.




## मुरूड बाजारपेठेत गर्दीचा अभाव



● (छायाचित्र: गणेश चोडणेकर)

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवाला अवघा एक दिवस शिल्लक असताना गणपती बाप्पाच्या आगमनाची सर्वत्र लगबग सुरू झाली आहे. मात्र, यंदा बाजारपेठेत अपेक्षित ग्राहकांची गर्दी दिसून येत नसल्याने व्यापारी वर्ग चिंतेत आहे. गणेशमूर्ती, सजावटीचे साहित्य, फुले, हार तसेच पूजेच्या साहित्याची दुकाने सजली असली तरी ग्राहकांकडून खरेदीला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे, महागाईच्या काळात नागरिकांचा खर्चाचा ताळमेळ कसा बसतो, याकडे व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## बाप्पा आले भक्तांच्या घरी



**। खांदेश्वर । प्रतिनिधी ।**

'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात लाडक्या गणरायाच्या आगमनाची लगबग दोन दिवसांपूर्वीपासूनच सुरू झाली. यावेळी पनवेलच्या भिंगारी परिसरातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये बाप्पाला घरी नेण्यासाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी होत होती.

गणेशोत्सवासाठी गेल्या तीन-चार महिन्यांपासून मूर्तिकारांनी घेतलेली मेहनत आता फळाला आली आहे. भक्तांच्या मनातील संकल्पना, आवड आणि श्रद्धा लक्षात घेऊन मूर्तिकारांनी आकर्षक गणेशमूर्ती साकारल्या आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून मातीला आकार देत, रंगसंगती आणि नक्षीकाम करत मूर्तिकारांनी बाप्पाचे रूप साकारले. आता तोच लाडका गणराया गेल्या दोन दिवसांपासून कारखान्यातून भक्तांच्या घरी जाण्यास सज्ज झाला होता. यादरम्यान, आपल्या हातून साकारलेली मूर्ती भक्तांच्या घरी जाताना पाहून मूर्तिकारांच्या चेहऱ्यावर समाधानाबरोबरच भावुकता दिसून येत होता. अनेक महिन्यांची मेहनत आणि बाप्पाशी जुळलेले भावनिक नाते असल्याने मूर्ती कारखान्यातून बाहेर पडताना मूर्तिकारांचेही मन गहिवरून येत होते. भक्तांकडून आपल्या आवडीनुसार गणेशमूर्तीची निवड केली गेली असून, आज तिची विधिवत पूजा केली जात आहे. दरम्यान, 'बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाला घरी नेण्यात आले.

## पालीत खरेदीसाठी भाविकांची गर्दी

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

पालीच्या श्री बल्लाळेश्वर गणपती मंदिर परिसरात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भाविकांची मोठी गर्दी होत आहे. गणपतीच्या पूजेसाठी लागणारे साहित्य आणि रानभाज्यांच्या खरेदीसाठी बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण आहे. पालीच्या बाजारपेठेच्या रस्त्याच्या कडेला स्थानिक आदिवासी महिला विक्रेत्या बसल्या असून, त्यांच्याकडील रानभाज्या कवळाले (कवडाले) आणि पेंग्वी याला विशेष मागणी वाढली आहे. गणपतीच्या नैवेद्यासाठी आणि भाजी म्हणून या रानभाज्यांना पसंती दिली जाते. तसेच, गणपती सजावट साहित्य खरेदी करताना भाविकांनी रविवारी (दि.१३) सकाळ पासूनच तुडुंब गर्दी केली.

## गणेश विसर्जनाचा मार्ग सुकर



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाडा तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची झालेली दुरवस्था, रस्त्यालगत साईडपट्टीचा अभाव तसेच तलावात वाढलेली जलपर्णी आणि तलावाच्या काठावर वाढलेले गवत व झुडपांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घेत रस्ता दुरुस्ती, साईडपट्टीचे काम आणि तलाव परिसराची स्वच्छता करून नागरिकांची मागणी पूर्ण केली.

मोहोपाडा तलावावर दरवर्षी दीड दिवस, पाच दिवस, सात दिवस तसेच अनंत चतुर्दशीला मोठ्या संख्येने गणरायांचे विसर्जन केले जाते. त्यामुळे विसर्जन घाटाकडे जाणारा रस्ता सुस्थितीत असणे आवश्यक आहे. मात्र, रस्त्याच्या कडेला साईडपट्टी नसल्याने आणि तलावाजवळील रस्ता खराब झाल्याने गणेश विसर्जनावेळी भाविकांना अडथळ्यांचा सामना करावा लागण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायत सदस्य रसिका खराडे, प्रतिक्षा राऊत व आकाश जुईकर यांनी पुढाकार घेत तलावाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरुस्ती व साईडपट्टीचे काम करून घेतले. तसेच, गणपती घाट व तलावाच्या काठावरील परिसरातील वाढलेले गवत आणि झुडपे हटवून स्वच्छता करण्यात आली. तलावातील वाढलेली जलपर्णी हटविण्याचे कामही करण्यात आले. दरम्यान, गणेशोत्सवाच्या गणेश विसर्जनासाठी सुरक्षित आणि सुकर मार्ग उपलब्ध व्हावा, तसेच तलाव परिसर स्वच्छ व व्यवस्थित राहावा, या उद्देशाने करण्यात आलेल्या या कामाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.


जय गणेश



ज्येष्ठेभ्यो ज्येष्ठराजाय ज्येष्ठपदप्रदायिने महोदराय पूर्णाय पूर्णानंदाय ते नम:

दैनंदिन कार्यक्रम:
श्रींचे आगमन मिरवणूक (मयूर रथ) - दि. १४ सप्टेंबर: स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजा: दि. १५ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयाग (उत्सव मंडप): शुभारंभ - १४ सप्टेंबर - दु. १ वा. दि. १५ ते १८ सप्टेंबर स. ८ ते १२, दु. १ ते ५
श्री हरी जागर-समस्त वारकरी बंधू: दि. १५ सप्टेंबर: रात्री १० ते २
सामूहिक सूर्य नमस्कार: दि. १६ सप्टेंबर: स. ६
सामूहिक अग्नीहोत्र: दि. १७ सप्टेंबर: पहाटे ५.३०
मंत्र जागर (एकादशी): दि. २२ सप्टेंबर: दुपारी ४
सत्यविनायक पूजा: दि. २४ सप्टेंबर: सायं.५ ते ७
महिला हळदी-कुंकू: दि. २४ सप्टेंबर: सायं.७ ते ८
''श्री वक्रतुंड'' रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक दि. २५ सप्टेंबर २०२६ - दु. ४ वाजता

जय गणेश

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे

सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२६

वर्ष १३४वे

'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना आज सोमवार दि. १४/०९/२०२६ सकाळी ११.११ वा.
श्री हित मोहित मराल गोस्वामीजी महाराज, श्री राधावल्लभ मंदिराचे १८वे तिलकायत अधिकारी, वृंदावन, उ.प्रदेश

देखाव्याच्या विद्युत रोषणाईचे उद्घाटन: "प्रेम मंदिर, वृंदावन" सायं. ७ वाजता
मा.ना.मुरलीधर मोहोळ, नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते

गणेशयाग शुभारंभ: आज दि. १४ सप्टेंबर, दुपारी १ वाजता
शुभहस्ते: परमपूज्य श्री.श्री.१००८ श्री महंत आचार्य संगीत कृष्ण सांवरिया बाबा,
अध्यक्ष, अखिल भारतीय चतुर संप्रदाय, गोवर्धन, मथुरा

ऋषि पंचमी: दि. १५ सप्टेंबर, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणे: मा.सौ.मंजुषाताई दीपक नागपुरे, महापौर, पुणे, मा.सौ.शीतल तेली-उगले, विभागीय आयुक्त, पुणे



श्री हित मोहित मराल गोस्वामीजी महाराज

भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज सोमवार दि. १४ सप्टेंबर ते शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.



मा.मुरलीधर मोहोळ



आचार्य संगीत कृष्ण सांवरिया बाबा



मा.सौ.मंजुषाताई दीपक नागपुरे



मा.सौ.शीतल तेली-उगले

दररोज बाप्पांची आरती: वेबसाईट YouTube facebook Instagram



प्रेम मंदिर, वृंदावन

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोन: २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोन: २४४९२०००

E-mail: contact.dhgt@gmail.com jayganesh.dhgt@gmail.com

बाप्पांचे ॲप डाऊनलोड करा: २४ तास बाप्पांचे थेट दर्शन


कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)